# घराकडे अपुल्या... (२)

दोन अंकी नाटक

**लेखक : प्रल्हाद जाधव**

पात्रे :
विक्रम (३०)
शर्वरी (२८)
शिवा (६०)
पार्वती (५५)
बाज्या (७०)

**अंक पहिला** / प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. प्रकाश. प्रेक्षक आणि रंगमंच यामध्ये एक छोटी वाहती नदी आहे अशी कल्पना. पलीकडचा किनारा दिसत आहे. त्या मागे डोंगर. त्याही मागे वर थोडे आकाश दिसत आहे. तो अर्थात पांढरा पडदा. वर किल्ला आहे अशी कल्पना. किनाऱ्यावर गवताळ-खडकाळ अशी छोटीसी मोकळी जागा. प्रेक्षकांच्या उजव्या हाताला विंगेच्या आत शिवा बांदल याचे घर आहे अशी कल्पना. मोटरसायकल थांबल्याचा आवाज. विक्रम (३०) आणि शर्वरी (२८) येतात. शर्वरी-देखणी, बुद्धिमान. मुंबईत 'थ्री-डी' ही स्वतःची कंपनी चालवते. विक्रम- हॅण्डसम, हुषार. स्वीडनमध्ये डब्ल्यू. एम.जी. या कंपनीत एच. आर. मॅनेजर.पॅन्ट, टी- शर्ट, जॅकेट असा वेष. शर्वरी थोड्याफार फरकाने तशाच वेषात. ट्रेकिंग शूज, कॅप, विण्डचीटर, सॅक असा जामानिमा. साईड-बॅगेत मोबाईल. सॅकमध्ये लॅपटॉप, पाण्याची बाटली, दुर्बिण असे साहित्य. बाजूच्या एका दगडावरून उडी मारून रंगमंचावर यावे लागते.

शर्वरी : (उडी मारून पलिकडे जाते आणि विक्रमला तिकडून हात देत) या इथे पाय ठेव दगडावर... सावकाश, शेवाळ माजलंय, सावकाश, अश्शी ऽऽऽ हं चल... गणपती बाप्पाऽऽऽ ( तो 'मोरया ऽऽऽ' म्हणत उडी मारतो आणि पलिकडच्या काठावर धडपडत आडवा होतो.)
शर्वरी : अरे हो हो, दमानं... लागलं नाही ना कुठं?
विक्रम : नाही नाही, नो प्रॉब्लेम, आय विल मॅनेज.(वर पहात) एवढं वर चढून जायचंय... पहिल्याच बॉलला आऊट होऊन कसं चालेल?
शर्वरी : व्हेरी गुड! दॅट्स द स्पिरीट!
विक्रम : (अंदाज घेत) वाटलं नव्हतं एवढ्या उंचावर असेल किल्ला म्हणून!
शर्वरी : दिसतं तसं नसतं!
विक्रम : ते ठीक आहे पण ‘दुरून डोंगर साजरे’ असं म्हणायची वेळ येऊ नये म्हणजे झालं. संध्याकाळी पोचायचंय परत मुंबईत, म्हणजे चार वाजता तरी उतरायला सुरुवात करावी लागेल.
शर्वरी : (पहात) एखादा गाईड मिळाला असता तर बरं झालं असतं.
विक्रम : गाईड्स मिळतात इथं असं म्हटलंय वेबसाईटवर. (मोबाईल पहात) चेक करू का पुन्हा एकदा?
शर्वरी : कोणीतरी दिसतंय तिकडं, गुराखी आहे वाटतं. (टाळ्या वाजवत) शुक शुक्...काका, अहो काका ऽऽऽ
शिवा : (आतूनच) मला म्हणताय का?
शर्वरी : हो, प्लीज येताय का जरा?
शिवा : आलू आलूऽऽऽ ( शिवा येतो. शिवा बांदल. साठीत असला तरी पन्नाशीतील भासणारा. सुदृढ, प्रसन्न-बुद्धिमान व्यक्तीमत्व. धोतर, बंडी, डोक्याला मुंडासे. हातात काठी, खांद्यावर घोंगडीची खोळ)
शिवा : रामराम ताई!
शर्वरी : नमस्कार!
शिवा : बोला?
विक्रम : गडावर चाललोय. रस्ता माहीत नाही... गाईड मिळेल का इथं एखादा?
शिवा : आता एवढ्या उशिरा कुठला गाईड? सकाळ झाली की जो तो लागला आपल्या कामाला!
विक्रम : मग तुम्ही येता का आमच्यासोबत?
शिवा : तसा मी जातो कवा कवा, पर घराकडं बघाया कोण न्हाय आता... बायको गेलीय बिरवाडीला आणि नाम्या, महाडला! गुराढोरांकडं बघायापण कोण न्हाई!

विक्रम : रिक्वेस्ट होती, बघा जरा जमलं तर...
शिवा : माझं ऐकाल तर घरी जावा परत. पावसानं दैना झालीय सगळी... दरडी कोसळायचीपण शक्यता हाय.
शर्वरी : खूप लांबनं आलोय, परत कधी जमणार काका?
शिवा : आन रस्ता चुकला, पाय घसरून पडला, काय भानगड झाली तर निस्तरणार कोण? वरनं सरळ या 'काळ-ढवात' पडाल. हाडपण गावायचं न्हाय.
विक्रम : (शर्वरीकडे रोखून पहात) तरी मला शंका होतीच.
शर्वरी : तेवढं कळतं हो, इतके काही लहान नाही आम्ही.
शिवा : आसं आसंल तर तुमची मर्जी. ही वाट धरून असं वळत वळत वर जायाचं. वाट सोडायची नाय म्हजी झालं!
शर्वरी : तुम्ही चला की सोबत. चुकलो बिकलो तर?
शिवा : आत्ताच धा-बारा पोरांची एक टोळी गेलीय पुढं, त्यांचा अंदाज घेत मागं मागं जावा त्यांच्या...
विक्रम : लांब गेले असतील हो ते, उगाच फजिती नको.
शिवा : म्हणून म्हणतूय - शहाणं असाल तर इथनंच नमस्कार करा उमाईला आन फिरा माघारी, एवढं काय करणार वर जाऊन?
विक्रम : गड बघितल्याचं समाधान, दुसरं काय?
शिवा : हो पण पावसा-पाण्याच्या दिसातच का यावंसं वाटलं तुमाला? पत्त्या कुणी दिला हितला?
विक्रम : गुगलवर सर्च केलं, 'फोर्ट्स ऑफ महाराष्ट्रा' त्यात भैरवगड दिसला. मुंबईवरनं माणगावपर्यंत येणारच होतो, म्हटलं यावं जाऊन,नकाशा डाऊनलोड केला आणि सुटलो!
शर्वरी : मला कारवीपण बघायची होती फुललेली–
शिवा : हे कारवीचं कुणी सांगिटलं तुमास्नी?
शर्वरी : गुगलवर मिळते सर्व माहिती.
शिवा : आपल्याला काय जमत न्हाय बाबा ते!
विक्रम : पुढं जायचं तर शिकावं लागतं त्यासाठी.
शिवा : आमची पिढी मोडीत निघाली हेच खरं! आमचा नाम्या मातर मोबाईलवर नायतं काम्पुटरवर बसून बटनं दाबत बसतोय सारखा, पण आमच्या ध्यानात येत नाही त्यातलं कायबी.
विक्रम : चला सोबत, काय फी असेल देऊ तुमची.
शिवा : पैशाचं काय नाय एवढं पण एकदा का चढाईला सुरूवात केली की उमाईच्या पायावर डोकं ठेवल्याशिवाय मागं फिरता येणार नाही. आताच इचार करा काय ते. दोन तास जायाला, दोन येयाला?
विक्रम : (मोबाईलवर वेळ पहात) सहापर्यंत खाली परत आलो म्हणजे झालं... मग मोटरसायकल आहे आमची!
शिवा : असं म्हणता? (गायीच्या हंबरण्याचा आवाज येतो) मंग थांबा वाईच, चांदीला बांधून येतो ...
विक्रम : चांदी?
शिवा : गाय हो आमची.
विक्रम : असं होय?
शिवा : (पुन्हा हंबरण्याचा आवाज. घराच्या दिशेने निघत) आलू आलू – हेऽऽ हैक, हैऽऽक. व्हय म्होरं! पारी आल्यावर घालील तुला चारापेंडी. (मध्येच तिकडून वाघ्या भुंकतो.) चल ए वाघ्या, आता तू लाडात येऊ नग. व्हय म्होरं, चल! (मागे वळून त्या दोघांना) मुका प्राणी हाय पर लय माया त्याची माझ्यावर,आलो म्या... (घराकडे निघून जातो)
विक्रम : (फोन वाजतो. फोन पहात) चॅयला, स्वीडनवरनं हॅरीचा फोन!(चिंतीत) काय सांगू त्याला आता?
शर्वरी : सांग तुला जे योग्य वाटेल ते!

विक्रम : (क्षणभर विचार करून फोन घेतो) हॅलो हॅरी, हौ आर यू? ग्रेट. आय ॲम फाईन. हौ इज ज्यो? स्टिल गोइंग स्ट्राँग! (हसत) आय नो, आय नो. ग्रेट. येस, येस. थँक्यू. थँक्यू. शर्वरी? शी इज फाईन, एव्हरीथिंग इज इन कंट्रोल नाऊ. डोन्ट वरी. या या,ओके, ओके. येस आय विल बी बॅक इन फोर-फाईव्ह डेज् बट गिव्ह मी सम टाईम टू थिंक...आय सी, ओके, ओके. थॅन्क्यू ...बाऽऽय हॅरी! (फोन खिशात ठेवत शर्वरीला) उद्यापर्यंत फायनल कळवायचं आहे, नाहीतर नवीन माणूस घेतो म्हणाला!

शर्वरी : (विचारमग्न)

विक्रम : आणि त्याचं तरी काय चुकतंय मला सांग!आठ दिवसांसाठी आलो इथं पण पंधरा दिवस झाले आता...

शर्वरी : टाईम-टेबल थोडं माग पुढे झालं पण आपल्या हातात काहीच नव्हतं... तू ठरव काय ते!

विक्रम : काय ठरवू? एवढी चांगली नोकरी मिळणार आहे का मला इथं? त्यात प्रमोशन ड्यू आहे... तू चल बरोबर, तर ते पटत नाही तुला. तुझ्या कंपनीची शाखा तिकडंपण सुरू करू शकतो आपण! (शांतता) अशी संधी पुन्हा मिळणार नाही हे लक्षात घे शरे!

शर्वरी : फ्रॅंकली स्पीकिंग, इथं बाबांना असं एकटं सोडून मी नाही येऊ शकत इतक्या लांब.

विक्रम : त्यांनापण बरोबर घेऊन जाऊ की!

शर्वरी : त्यांना नाही मानवणार तिकडचं हवामान. आणि अशा डेलिकेट स्थितीत न्यायचं त्यांना म्हणजे अवघडच होणार सगळं...

विक्रम : तुझीच इच्छा दिसत नाही! (खोचकपणे) दुसरा कोणी बघून ठेवला नाहीस ना इकडे?

शर्वरी : कमॉन! तूच बघून ठेवली असशील एखादी!

विक्रम : मूड खराब नको करू सकाळी सकाळी!

शर्वरी : मी कुठं करतेय, तूच शिरतोयस वाकड्यात. तुला माहितायना कशासाठी आलोय आपण इथं ते? (शांतता) जाऊया का का परत?

विक्रम : अगं थोडी गंमत करत होतो... सॉरी!

शिवा : (एक मोठं बोचकं घेऊन येतो. हातात काठी. काठीच्या वरच्या टोकाला लोखंडी फाळ.) चला पोरांनो!

विक्रम : तुमचं नाव काय काका, विचारलंच नाही आम्ही.

शिवा : शिवा बांदल! गावात समदे शिवाच म्हनत्यात मला. तुमीबी म्हना शिवा, 'शिव्या' म्हनलं तरी चालेल. (हसतो)

शर्वरी : छे छे, असं कसं? वयाचा तरी मान ठेवला पाहिजे की नाही आम्ही?

शिवा : त्यात काय एवढं? लाडात आली की आमची पारीसुदिक शिव्या म्हनती मला.

शर्वरी : पारी?

शिवा : बायको माझी. पार्वती हो! बिरवाडीला गेलीय दूध घालाया. येईल दुपारपतूर.

शर्वरी : दुधाचा रतीब घालता का तुम्ही?

शिवा : व्हय तर? दूध, दही, तूप, खवा, भाजीपाला समदं इकतो आमी थोडं थोडं. पोटापाण्याला पायजे ना कायतरी! अडीनडीला मोफत देतो गरजू माणसाला.

विक्रम : मुलगा काय करतो तुमचा?

शिवा : दहावीत हाय आता, पर शेतीभातीच्या कामातच लय इंट्रेस हाय बघा त्याला.

शर्वरी : आय सी!

शिवा : 'काळभाता'चं बियाणं घेऊन महाडला गेलाय...कृषी प्रदर्शन भरलंय तिकडं.

विक्रम : काळभात?

शिवा : भाताची जुनी जात हाय ती! कितीबी खावा, डायबिटीस न्हाय का काय नाय.

शर्वरी : अरे व्वा!

शिवा : आपली कडधान्य, भाजीपाला, पपई - कलिंगडं; हायब्रिड बियाणांनी मारून टाकलं समदं... म्हणून जुनी बियाणी जपून ठिवतो आमी. एखादा शहाणा माणूस भेटला तर देतो त्याला.

विक्रम : जमाना बदललाय काका, काळाबरोबर बदलावं लागतं...

शिवा : पर मूळची वळंखच पुसून जाईल इतकंपण बदलणं बरं न्हाय ! (संगीत)

शर्वरी : खरं आहे.

शिवा : समदा कस जात चाललाय आपल्या आविष्याचा!

शर्वरी : (क्षणभर विचार करत) चलू या आता नाहीतर इथंच वेळ जायचा बोलता बोलता.

शिवा : हो चला, चला!

शर्वरी : थॅन्क्स, तुम्ही वेळ काढलात आमच्यासाठी...

शिवा : त्यात काय एवढं, तसंपण गडावर जाया कायम खुश असतो म्या. तेवढंच उमाईचं दर्शन होतं. चला, पाऊस आला तं फजिती व्हईल चांगली!

विक्रम : (सॅक पाठीला लावत) चला!

शिवा : छत्री-विंडचिटर कायतरी आणलं आसंल ना सोबत?

विक्रम : हो हो, विंडचीटर घेतलंय ना!

शिवा : शाब्बास! (समजावून सांगत ) हे बघा, आपण जिथं उभं आहोत ती ही झिपरी नदी. तिचं पाणी वरनं बघितलं तर एखाद्या बाईनं मोकळ्या सोडलेल्या  झिपऱ्यागत दिसतं, म्हणून तिचं नाव झिपरी...

शर्वरी : वाव्व!

शिवा : हा इकडं काळ-ढव. त्याच्या खोलीचा अंत लागत न्हाय. कितीबी दुष्काळ पडला तरी पाणी आटत न्हाय त्याचं. बालेकिल्ल्यावरनं एखादा दगड फेकला तर तो डायरेक्ट ढवातच पडतोय ह्या! (वर हात करत) ही तटबंदी, वर चोरदिंडी, उजव्या हाताला धाकला पाणवठा. पुढं वाघुळ-भुयार, तिथनं उभी चढाई, मग माकडखिंड,  कारवीचा माळ, बैरागीवड, येडीधोंड... थोडं वर गेलं की घोड्यांची पागा, नगारखाना, म्हाराजांचं स्मारक, उमाईचं मंदीर आन् बालेकिल्ला...

शर्वरी : ओ माय गॉड! सो एक्सायटिंग!

शिवा : चलायचं?

दोघेही : हो हो, चला!

शिवा : थांबा वाईच! (बोचक्यातून एक रोप काढत) हे घ्या!

विक्रम : हे काय?

शिवा : रोप हाय... लावून घेतो तुमच्यासारखं कोण भेटलं तर. पुण्याचं काम हाय! झाडं लावली पाहिजेत आपण, सांभाळली पायजेत, वाढवली पाहिजेत... महाराजांनी तरी काय सांगितलंय दुसरं?

शर्वरी : ओ ग्रेट!

शिवा : (एका ठिकाणी फाळानं खड्डा खणत) नर्सरी हाय आमची छोटुशी. तिथं तयार करतो आमी...

शर्वरी : कसलं आहे हे रोप?

शिवा : वडाचं हाय. बोलता बोलता वाढतं बघा. डेरेदार रहातं वर्षभर. लालभडक टेंबरं येतात पानोपानी... लांबलांबनं पक्षी येतात ती खायाला. घरटी बांधतात. सावली राहाती वर्षभर! प्राणी-पक्ष्यांना मोठा आधार होतोय त्याचा. हे घ्या! (विक्रम-शर्वरी ते घेत प्लास्टिकची पिशवी फाडून रोप बाहेर काढतात) पर हे लावताना कुणाचीतरी आठवण म्हणून लावायचं बरं का. मग कसं झपाट्यानं वाढतंय बघा ते. डोळे मिटा अन् तुमच्या आवडत्या माणसाची आठवण काढा...चला... (संगीत येते. शर्वरी रोप खड्ड्यात ठेवताना एकदम रडू लागते. आधी हळू मग एकदम उमाळा येतो. हुंदके दाबत आहे.

शिवा :   (गोंधळलेला.) काय म्हणावं ह्या कर्माला! काही चुकलं का माझं?

विक्रम : (शिवाला) नाही, नाही. तुमचं काही चुकलं नाही. (शर्वरीला थोपटत) शांत हो शर्वरी, शांत हो! (शिवाला) आई गेली हिची नुकतीच! पंधरा दिवसपण झाले नाहीत अजून... (संगीत)

शिवा : असं व्हय?

विक्रम : हो.

शिवा : आन मंग क्रियाकर्म?

विक्रम : कालच झालं ते मुंबईत...हिची आई मूळची माणगावची. तिची इच्छा होती की तिच्या अस्थींचं विसर्जन  काळ नदीत करावं म्हणून! त्यासाठीच सकाळी लवकर निघालो मुंबईतनं. येतानाच ठरवलं होतं,इतक्या जवळ आलोय तर भैरवगड बघून जावं... मनपण हलकं होईल.

शिवा : आलं ध्यानात! (शर्वरीला) हं घ्या आईचं नाव आणि लावा हितं...(लावतात. दोघेही त्यावर माती घालतात, वॉटरबॅगमधील पाणी घालतात.)

शिवा : (खुश होत) आंग आश्शी ऽऽऽ शाब्बास! आन् बरं का पोरी– काय नाव तुझं?

शर्वरी : शर्वरी.

शिवा : वा झकास नाव हाय अगदी! (उच्चारण्याचा प्रयत्न करत) शर...शर... सावरी म्हनलं तर चाललं का?

शर्वरी : (खुद्कन हसत) हो, चालेल की!

शिवा : बरं... तर बरं का सावरीताई, दोन-तीन वर्षात कसं जोमानं वाढतंय बघा! आईच्या सगळ्या आठवणी फळाला येतील इथं, पाखरांची गर्दी व्हईल मायंदाळ!

शर्वरी : थॅंक्यू काका!

शिवा : अग मला कशाला थांकू म्हणती, निसर्गाचा नियमच हाय तो. एका हातानं काढून घेतो त्यो आन् दुसऱ्या हातानं पुन्हा वंजळीत टाकतो काहीतरी! मात्र तुमाला दरवर्षी एकदातरी यावं लागंल ह्याची वाढ बघायला, जमंल का ते?

शर्वरी : हो,अगदी नक्की!

शिवा : आपण लावलेलं झाड वाढताना बघण्यासारखा आनंद न्हाय दुसरा. (विक्रमला) आपलं नाव काय साहेब?

विक्रम : विक्रम.

शिवा : वि - क्र - म, जमलं ! वा, 'विक्रम आन् सावरी'! झ्याक जोडी हाय तुमची अगदी. तू काय कामधाम करतीस का न्हाय ग पोरी?

शर्वरी : कंपनी आहे मुंबईत आमची. 'थ्री डी' नावाची.  शिवा : काय नाव म्हणालीस कंपनीचं?

शर्वरी : ' थ्री डी ' ...' ड्रीम, डेअर ॲण्ड डी-कोड !'

शिवा : (हसत) पार आगदी डोक्यावरनं गेलं...

शर्वरी : सोप्या शब्दात सांगायचं तर महिलांच्या हक्काचं रक्षण करणं आणि त्यांना आधार देणं हे आमचं काम! कामकाजाच्या ठिकाणी पुरुषांनी महिलांशी कसं वागायचं हे पण शिकवतो आम्ही!

शिवा : (गोंधळातच) आणि तू काय करतोस रे पोरा?

विक्रम : ' वेलफेअर मिशनरीज ग्लोबल' म्हणून कंपनी आहे 'डब्ल्यू एम जी'... तिथं एच.आर. मॅनेजर म्हणून काम करतो. चॅरिटेबल संस्था आहे. चांगलं काम करणाऱ्या माणसांना मदत करायची असं स्वरूप आहे कामाचं.

शिवा : वा, बेष्ट एकदम. चला, पण जरा एक मिनीट हं, प्रार्थना करूया या झाडासाठी ...

शर्वरी : प्रार्थना?

शिवा : एक झाड म्हजी एक अख्खं जगच आस्तंय पोरानो. किडामुंगी, फुलपाखरं, पक्षी अंगाखांद्यावर खेळत्यात त्याच्या. घरटी करत्यात, माणसाला ते फुलं देतं,फळं देतं, सावली देतं, प्राणवायू देतं. ते नष्ट झालं तर एक पूर्ण दुनियाच नाहिशी व्हतीया का न्हाय? लाखो रुपये खर्च केले तरी पुन्हा निर्माण न्हाय करता येत ती आपल्याला! मग प्रार्थना कराय नको त्याची?

दोघेही : हो, खरंय अगदी.
शिवा : (हात जोडून त्याची आवडती सर्वधर्म-प्रार्थना म्हणू लागतो. विक्रम-शर्वरी नकळत हात जोडत साथ देतात)
ॐ तत्सत श्रीनारायण तू, पुरुषोत्तम गुरु तू
सिद्ध बुद्ध तू, स्कन्द विनायक, सविता पावक तू
ब्रम्ह मज्द तू, यहव शक्ति तू, ईशू पिता प्रभु तू
रूद्र विष्णु तू, राम कृष्ण तू, रहीम ताओ तू
वासुदेव गौ, विश्वरूप तू, चिदानंद हरी तू
अद्वितीय तू, अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू...
शिवा : (नमस्कार करत) चला!
विक्रम : आता तुम्ही ही प्रार्थना म्हटलीत ती -
शिवा : विनोबांची हाय ती! आमचे आजोबा वर्ध्याला गांधीजींच्या 'नई तालीम' शाळेत शिकले. तिथं रोज म्हणायची पद्धत होती. आमीपण हिकडं एखादं नवं काम सुरू करताना आठवणीनं म्हणतो ती!
विक्रम : वा!
शिवा : मुंबैला परत जाताना गागोद्यावरनं जाल तुम्ही–
(त्या दोघांच्या ते लक्षात येत नाही म्हणून समजावून सांगत) विनोबांचं गाव! त्यांच्या स्मारकाला भेट देऊन जा!
शर्वरी :(आता समजलेले) हो हो,अगदी नक्की!
शिवा : चला! (तिघेही निघतात. पुढे शिवा. काखेत गाठोडे. हातात काठी. मधे शर्वरी, शेवटी विक्रम. एका क्षणी शर्वरी सर्वांना थांबवते. 'एक सेल्फी काढूया' असे म्हणत सेल्फी काढते आणि सारे चढू लागतात.)
शिवा : (पुन्हा थांबत) येक इच्यारू का?
विक्रम : काय?
शिवा : मुलांना नाय आणलं तुमी? लहानपणीच आवड लागली पाहिजे त्याना निसर्गात फिरायची.
विक्रम : लग्न झालं नाही अजून आमचं. (संगीत)
शिवा : आँ?
विक्रम : हो!
शिवा : (गोंधळून) म्हजी कसं म्हणता?
विक्रम : मी राहतो तिकडं लांब परदेशात.
शिवा : परदेशात म्हजी नेमकं कुठं म्हणायचं ?
विक्रम : स्वीडनला...आहे का काही माहिती तिकडची?
शिवा : न्हाय बाबा, मुंबईच्या पलीकडं जग काय ते माहीत न्हाय आपल्याला.
विक्रम : माहीत नाही तेच बरं...आम्ही कसं जगतो ते  आमचं आम्हालाच माहीत.
शिवा : मंग हिला घेऊन जावा की तिकडं मदतीला.
विक्रम : इतकं सोपं नाही ते. वड्लांना येथे ठेवून हिला भारत सोडता येत नाही आणि मला तिकडची नोकरी सोडून इकडे येता येत नाही!
शिवा : मं जमलं तरी कसं तुमचं?
विक्रम : वेबसाईटवरनं माहिती घेतली, तिथंच जुळलं! फक्त मुहूर्त काढायचा बाकी राहिलाय. आई गेली हिची म्हणून थांबलोय थोडं...
शिवा : आई उमाईची इच्छा! तुमाला पटो न पटो तिच्या मनात आसंल तसंच व्हणार... चला!

विक्रम : चलो!
शिवा : वर गेल्यावर एक गंमत सांगतो बरं का पोरांनो!
शर्वरी : अय्या, कसली गंमत?
शिवा : आताच सांगिटली तर गंमत काय राहिली त्यात?
शर्वरी : तेही खरंच आहे तुमचं, चला!
शिवा : (प्रात्यक्षिक दाखवत) हे बघा, उभ्या चढणीची वाट सुरु झाली की पाऊल हे असं आडवं टाकायचं, हे बघा, असं आडवं, आलं ध्यानात?
विक्रम : आलं...
शिवा : आन् अगदी ल्हान ल्हान पावलं टाकत येका लयीत चालायचं, म्हजी दम लागत न्हाय...काय?
शर्वरी : हो हो आलं लक्षात, चला! (एकदम) अय्याऽऽऽ
शिवा : काय झालं ग पोरी?
विक्रम : काय झालं शरे?
शर्वरी : अरे ते बघ फुलपाखरू! ते बघ... तिथं त्या पानावर बसून त्यावर साठलेलं पाणी कसं पितंय बघ मस्तपैकी!
विक्रम : कुठाय कुठाय, दाखव ना मला!
शर्वरी : अरे ते बघ तिकडे... ते ते,तिकडे!  दिसलं?
विक्रम : हो हो दिसलं, पंख वर-खाली करत कसं पीतंय बघ! ओं व्वाव!
शिवा : (हसत) इथं पावलोपावली अशा मायंदाळ गोष्टी दिसत राहत्याल तुमाला. गडावर आलं माणूस, की काय बघू नि काय नको असं व्हतं त्याला. चला चला, नायतर उशीर व्हईल हितंच!  (निघतात...खळाळणारे पाणी, पक्ष्यांचा किलबिलाट, मंजुळ वारा असं संगीत. अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(प्रकाश. डोंगरावरील अधिक उंच भाग. रंगमंचाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वळणाची गवताळ वाट. एकीकडे झाडाचा आडवा बुंधा. बुंध्यावर बसता येते. बुंध्याला अडकून पडलेला एक दगड. मागच्या डोंगर भिंतीत मधोमध बसता येईल, हालचाली करता येतील अशी थोडी मोकळी जागा. दुसऱ्या बाजूने वर जाता येते. तिकडे आणखी उंच डोंगर. त्यामागेआकाश अर्थात् तो पांढरा पडदा. तो आता थोडा अधिक दिसत आहे. दगडाच्या खालील बाजूने म्हणजे प्रेक्षकांच्या उजव्या बाजूच्या विंगेतील चढ चढून, उडी मारून शिवा वर येतो. बोचकं, काठी मोकळ्या जागेत ठेवून शर्वरीला हात देऊन वर घेतो. वर येताना तिची, 'ओ माय गॉड' अशी प्रतिक्रिया. पाठोपाठ तो विक्रमला वर घेतो. त्याचीही अशीच 'अरे बापरे, कठीण आहे' अशी काहीशी प्रतिक्रिया.)
शिवा : दमला असशाल, टेका जरा वाईच!
शर्वरी : (विक्रमला) पाण्याची बाटली दे जरा. (तो देतो.  तळाला पोचलेले पाणी ती घोट घोट घेऊ लागते.)
विक्रम : थोडं खाऊया काहीतरी.
शर्वरी : येस ऑफकोर्स! (सॅकमध्ये शोधत) ओ माय गॉड!
विक्रम : काय ग, काय झालं?
शर्वरी : अरे खाऊची पिशवी आणलीच नाही आपण वर!
विक्रम : असं कसं होईल, माझ्या हातानं लावली होती मी ती मोटर-सायकलला! एकातएक दोन पिशव्या होत्या.
शर्वरी : बरोबर पण नदी क्रॉस करताना सॅकमध्ये टाकायचं राहून गेलं ते पार्सल.

विक्रम : ओ शिट्! अशी कशी ग मॅड तू? पिझ्झा-बर्गर- सॅन्डविच, बिस्किटं,चॉकलेट्स सगळं होतं...

शर्वरी : सॉरी यार सॉरी, मी काही मुद्दाम नाही केलं ते!

विक्रम : शिट्! पाणीपण संपत आलंय, बाटली रिकामी झालीय. हॉटेल-बिटेल आहे का वर एखादं काका? पोटात कावळे कोकलायला लागलेत आतापास्नंच.

शिवा : हॉटेल कुठलं आलंय इथं, पडका किल्ला हा!

विक्रम : डोन्ट टेल मी!

शिवा : ना त्यावर कधी लढाई झाली ना कुणी कारभार केला. सुफी संत, गोसावी-बैरागी काय राहून गेलं तेवढंच. रातच्याला भजनांचा आवाज ऐकू येतो तेवढीच जाग!

शर्वरी : सरकार लक्ष घालत नाही का?

शिवा : सरकार? उलट पायथ्याशी सॉ-मिल टाकायची परवानगी मिळालीय इथल्या आमदाराला.

शर्वरी : ओ गॉड! सॉ-मिल हा कत्तलखानाच की झाडांचा!

शिवा : अगदी लाख बोललीस!

शर्वरी : पण मग लोक काही विरोध नाही का करत?

शिवा : मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण?

विक्रम : असं कसं म्हणता? मॅच्युअर झालेली झाडं घरबांधणीसाठी, फर्निचरसाठी उपयोगी पडतात का नाही माणसाला? ती तोडायला लायसन्स मिळतं. उत्पन्न मिळतं सरकारला! आणि वाळलेलं झाड तर पूर्ण मेलेलं असतं हे लक्षात घ्या!

शिवा : तुमाला नाय कळायचं ते! वाळक्या झाडातपण पक्षी घरटी करत्यात, किडामुंगी,वाळवी आपलं संसार थाटत्यात... अन् त्याचा पार भुगा झाला तरी त्यापास्नं माती तयार व्हती का न्हाय शेवटी?

शर्वरी : अगदी बरोबर काका! डेड वूड इज नॉट डेड!

शिवा : म्हजी ग काय पोरी?

शर्वरी : झाड खऱ्या अर्थानं कधीच मरत नाही!

शिवा : आमाला इंग्रजी कळत नाही, आमी अडाणी!

शर्वरी : खरे अडाणी आम्हीच.

शिवा : त्ये कसं?

विक्रम : चांगलं खायला आणलं होतं ते खाली राहिलं... आता उपाशी मरणार!

शिवा : (मिश्कीलपणे पहात) झुणका-भाकर चालंल का?

शर्वरी : (अविश्वासाने) झुणका-भाकर? ऐकूनच तोंडाला पाणी सुटलं. आणलीय का? काढा पटकन!

शिवा : ('दम धरा जरा' असं म्हणत बाजूच्या झाडाची काही पानं काढून त्यांच्या हातात देत) घ्या! पळसाच्या पानावर जेवलाय का कधी?

विक्रम : पळसाला पानं तीनच, या म्हणी पलीकडे या झाडाशी संबंध नाही आला कधी! (शर्वरी उकळी फुटल्यागत हसते)

शिवा : (बोचकं सोडतो. झुणका-भाकर, ठेचा काढून देत) घ्या, खा तुम्ही, तवर धाकल्या पाणवठ्यावरनं पाणी भरून आणतो म्या, द्या ती बाटली हिकडं! (बाटली घेऊन जातो)

विक्रम : आयला, हा म्हातारा येडाच दिसतोय अगदी.

शर्वरी : हो ना,पळसाची पानं काय, नाचणीची भाकर काय, झुणका, ठेचा... (घास घेत) आणि टेस्ट बघ काय 'यमी' आहे ती! वा, क्या बात है! (मिटक्या मारत खाऊ लागते)

विक्रम : (एक घास घेत) टेस्ट यम्मी आहे पण डोळ्यातनं पाणी काढतोय हा ठेचा...अयाईऽऽऽ गं...

शर्वरी : सावकाश, सावकाश!

विक्रम : (तिखट लागलं म्हणून 'हाऽऽऽ' करतो.) तू काही म्हण पण पिझ्झा-बर्गरची सर नाही झुणका-भाकरीला!
शर्वरी : (थोडी चिडत) आयत्यावेळी एवढं चांगलं अन्न मिळालं हे कमी आहे का? आणि असं अचानक निसर्गाच्या सान्निध्यात लंच होईल आपलं अशी कल्पना तरी केली होतीस का?
विक्रम : किती रोमँटिक होतेस ग तू प्रत्येकवेळी?
शर्वरी : म्हणजे? कसं वागावं मी असं म्हणणं आहे तुझं?
विक्रम : तुझंच असं नाही पण माणसांनं नेहमी फोकस्ड राहावं... आपलं मिशन विसरू नये कधी! (संगीत)
शर्वरी : (त्याच्या मनात काय आहे ते उमजून) मघाशी फोन आला तेव्हा मूड कसा होता हॅरीचा?
विक्रम : कसला मूड? शेवटची वॉर्निंग दिलीय त्यानं!
शर्वरी : पण मी तरी काय करणार? अशा परिस्थितीत बाबांना एकटं सोडून नाही येऊ शकत मी तिकडं.
विक्रम : आपण त्यांनाच तिकडं घेऊन जाऊ म्हणतोय मी!
शर्वरी : काय व्हायचं ते इथंच होऊ दे असं म्हणतायंत ते!
विक्रम : भावनेच्या भरात बोलू नको. नीट विचार करून सांग. छान लग्न होईल... गाडी, बंगला,पैसा, प्रमोशन... मुलं चांगल्या शाळेत जातील, जगाची नागरिक होतील... कशाची ददात म्हणून राहणार नाही!
शर्वरी : (गप्प)
विक्रम : उद्या सकाळपर्यंत कळवायचाय निर्णय...
शिवा : (येतो. त्यानं पाण्याची बाटली भरून आणलेली.
सोबत एक काठी.) हे घ्या पाणी! ( विक्रम बाटली ओढून घेत घटाघटा पाणी पितो) ही काठी सावरीसाठी. पुढचा मार्ग अवघड हाय जरा, तिकडं उपेगी पडंल तुला... झालं ना खाऊन?
शर्वरी : हो. फार मस्त बेत होता.
शिवा : उठा आता... लांबचा पल्ला हाय आजून.
(दोघेही 'हो चला चला' म्हणत निघण्याच्या तयारीत. तोच मागच्या बाजूने खालून पोवाड्याच्या ओळी ऐकू येतात.
शिवबाचे आगळे तेज, स्वप्नात शत्रूच्या रोज,
जाऊनी उतरवी माज, राखितो राज,
मुजरा मी करितो राजाला
नमितो मी त्याच्या चरणाला
मुजरा हा त्याच्या कार्याला
दादा रं जीरं दाजी रं जी जी जी ...
जय भवानी! जय शिवराय!
पाठोपाठ बाजीराव ऊर्फ बाज्या महाले मागून उडी मारून वर येतो. वय सत्तर. भरघोस छपरी मिशा. हातात काठी, मनगटावर कडे, कोपरी, मुंडासे. धोतर. घोंगडीची खोळ. काठीला एक गाठोडे बांधलेले.)
बाज्या : रामराम शिवा!
शिवा : रामराम बाज्यादा!
बाज्या : गडावर चाललाय जणू?
शिवा : व्हय.
बाज्या : गंगी दिसली का रं कुठं माझी?
शिवा : ही काय अशी गेली आताच वर.
बाज्या : च्यामारी!

शिवा : पाणी आणाय गेलोतो तर जाताना दिसली वर.

बाज्या : जरा बिडीचा झुरका माराय थांबलू तं पळाली म्होरं. न्हेमीची कटकट हाय. कशी संभाळावी काय समजंना गड्या! (त्या दोघांना पाहून) पाव्हणं कुठलं म्हणायचं?

शर्वरी : मुंबई! मुळचे इकडचेच पण आता राहतो मुंबईत.

विक्रम : स्टॅमिना पॉवरफुल दिसतोय आजोबा तुमचा, दमायला नाही होत का?

बाज्या : जुनं हाड हाय आमचं… आन आम्ही काय पिझ्झा, बर्गर खाणारे लोक न्हाय तुमच्यासारखे!

शर्वरी : अय्या, तुम्हाला कसं माहीत?

बाज्या : ते सांगाय कशाला हवं, दिसत न्हाय व्हय? (काठीच्या गाठोड्यातून पुडकं काढून देत) हे घ्या!

विक्रम : काय?

बाज्या : पार्सल तुमचं. खाली फटफटीला अडकवलेलं दिसलं, घ्या!

शर्वरी : ओ माय गॉड!

भाज्या : तुमचं शेहरातल्या माणसांचं ध्यान कुठं आसतंय नेमकं कळत नाही गड्या! सोताच्या वस्तू नीट संभाळता येत नाहीत तुमाला!

शर्वरी : ग्रेट! कसे आभार मानावे तुमचे कळत नाही.

बाज्या : (तारेत) होता जीवा म्हणून वाचला शिवा…

शर्वरी : आँ?

बाज्या : ( त्याच आवेशात) नायतं एकाच घावात सय्यदबंडा खांडोळी करणार होता म्हाराजांची. (विक्रम-शर्वरी पहातच आहेत) आन् तसं झालं अस्तं तं समदा इतिहास बदलून गेला असता आपला.

शिवा : खरं हाय!

बाज्या : पर एवढं असून शिवाजीच्या बाजूला जीवा महालाचा पुतळा हाय का कुठं, सांगा तुमी! शिवा काशीदचा पुतळा हाय का कुठं सांगा तुमी? हिरोजी फर्जंदचा पुतळा हाय का कुठं सांगा तुमी? अडीनडीला उपेगी पडणाऱ्या गोरगरीब माणसाची काहीच कदर नाय तुमाला… (तारेतच गाऊ लागतो.)

शिवबाचे आगळे तेज, स्वप्नात शत्रूच्या रोज,<br>जाऊनी उतरवी माज, राखितो राज,<br>रक्त सळसळे ,भरे कापरे,<br>शिवबाच्या पराकरमानं पृथ्वी हादरे<br>दादा रं जी रं दाजी रं जी जी जी …

(त्या तारेतच)

जय भवानी, जय शिवराय…<br>जीवा महालाचा पुतळा… झाऽऽऽलाच पाहिजे.<br>हर हर महादेव,<br>छत्रपती शिवाजी महाराज की ऽऽऽ जय!

गंगे, ए गंगे ऽऽऽ अगं कुठं गेली मस्नी टाकून एकल्याला! (असं म्हणत रंगमंचाच्या दुसऱ्या टोकाला जात तिथे वरच्या दिशेने उडी मारत निघून जातो. काही क्षण शांतता.)

शिवा : (या दोघांना) डोक्यावर परिणाम झालाय त्याच्या. याचा मोठा मुलगा खंडोजी ह्या डोंगर-कपारीत कायम फिरायचा. पशु-पक्ष्यांचा अभ्यास करायचा. गडभ्रमंती करणाऱ्या पोरांना चढाईतले डावपेच शिकवायचा. एकदा मधाचं पोळं काढायला म्हणून गेला वर, तिथनं खाली उतरताना पाय घसरून जो नाहिसा झाला तो परत कुणाला दिसलाच न्हाय. कोण म्हणतं

काळ-ढवात बुडाला, कोण म्हणतं वाघानं न्हेला... पण बॉडी काय आजवर सापडली नाय त्याची. तवाधरनं गंगी खुळी झालीय. तीस- चाळीस वर्सं झाली असतील पन शोध थांबला नाय त्यांचा अजून.

विक्रम : माय गॉड!

शिवा : त्यात सरकारनं त्यांची जमीन घेतली धरणासाठी आन् समदा इस्कोट झाला मग संसाराचा!...

विक्रम : ओह आय सी!

शिवा : भुतानं झपाटल्यागत फिरत असतात गडावर...

शर्वरी : सो सॅड!

शिवा : मुलगी व्हती काशी नावाची. ती बाळतपणात गेली, बाळ पण वाचलं न्हाय तिचं...

विक्रम : अरेरे, फार मोठी ट्रॅजेडी झाली हो.

शिवा : आता सोताचं दुःख इसरून महाराजांच्या बाजूला जीवा महालाचा पुतळा उभारावा आसं वरडत फिरत असतोय. ऐकून घेयाला येळ हाय कुणाला?(शांतता)

शिवा : 'शिवाजी कुणाचा...' हे ठरवण्यातच सगळी शक्ती जात चाललीय का न्हाय आपली?

शर्वरी : खरं बोललात अगदी! सगळीकडं तसंच झालंय... नुसती जीवघेणी धावपळ, आंधळी स्पर्धा,भाकड चर्चा... सगळं आभासी- भ्रामक जगणं... कशासाठी? कुठं चाललोय आपण असं वाटत राहतं...

विक्रम : (टाळ्या वाजवत) चला आता, की थांबायचंय इथंच तुमचं भाषण ऐकत?

शिवा : चला चला निघूया, लय चढाई बाकी हाय अजून.

शर्वरी : तुम्ही काहीतरी गंमत सांगणार होता ना काका?

शिवा : ती अजून वर गेल्यावर... पाऊस आला तर फजिती व्हईल आपली.

शर्वरी : तरी पण–

शिवा : हितनं अर्धा तास चाललं की वर कारवीचा माळ लागतो, कारवी बघायची हाय ना तुला?

शर्वरी : अय्या हो, चला, कधी एकदा बघीनसं झालंय...

शिवा : डोळं उघडं ठेवून चालायचं!

शर्वरी : ओ येस!

शिवा : तिकडं समोरच्या डोंगरावरवर बघा की जरा...

विक्रम : काय, काय?

शिवा : या हिकडं, (तो त्यांना दुसऱ्या कोपऱ्यात घेऊन जातो, तेथून दाखवत) ते बघा, दिसला त्यो डोंगुर? आन् त्यावरची ती ढगाची सावली? दिसली? वरचं भरलेलं आभाळ? दिसलं? आन् इकडं म्होरच्या अंगाला पडणारा पाऊस? दिसला?

शर्वरी : अय्या हो खरंच की! व्वाव!

विक्रम : (दुर्बीण काढून पहात) वा क्या बात है! सूर्यकिरण असे मिसळलेत ढगात की पहातच राहावंसं वाटतं...

शर्वरी : आणि इंद्रधनुष्य कसं पडलंय बघ,ओ माय माय!

विक्रम : अरे हो, खरंच की!

शर्वरी :(टाळ्या वाजवत) ओ, वाव्व! (प्रसन्न संगीत) काका, यू हॅव मेड अवर डे!

शिवा : म्हजी काय ग पोरी? मराठीत बोल की!

शर्वरी : (समोर पहात) असं देहभान हरपून टाकणारं दृश्य किती दिवसात दिसलं नव्हतं! शब्दच नाहीत माझ्याकडे वर्णन करायला...

शर्वरी : ते इंद्रधनुष्य बॅकग्राऊंडला राहील असा आमचा एक फोटो काढून देता का?

शिवा : हो देतो की पोरी!

(शिवाच्या चेहऱ्यावर खुशीचं स्मित. तो तिचा मोबाईल आपल्या हातात घेतो आणि फोटो काढण्यासाठी प्रयत्न करू लागतो. संगीत सुरू. आता ते इंद्रधनुष्य मागच्या पडद्यावर अवतरतं, तेथून रंगमंचावर आणि हळूहळू प्रेक्षागृहात फिरू लागतं. रिमझिम पावसाचा भास. ते संगीत वाढत जातं आणि हळूहळू अंधार.)

अंक पहिला / प्रवेश तिसरा

(प्रकाश. किल्ल्यावरील अधिक उंचावरचा टप्पा. एकीकडे मागे एक लेणीवजा गुहा. गुहेच्या तोंडावर लोंबणाऱ्या पारंब्या, झाडांची उघडी मुळे, गवत. दुसरीकडे वर उंच गेलेले एक झाड. त्याची डोंगराला धरून असणारी उघडी मुळे रंगमंचावर दिसत आहेत. समोरून चिंचोळी पायवाट. वाटेच्या मागेपुढे मोकळी जागा. प्रेक्षकांच्या बाजूला खोल दरी. डाऊन-स्टेजला झाडांचे दोन-तीन शेंडे. उंचावर आल्यामुळे मागील आकाश आता अधिक दिसत आहे.
अचानक अंधारून येते, वारा सुटतो. विजांचा कडकडाट. पावसाची हलकी सर. खालून शिवा, शर्वरी-विक्रम एकमेकांना हात देत वर येतात. आडोसा पाहून थांबतात. विक्रम-शर्वरी विंडचीटर तर शिवा घोंगडी झटकून झाडाच्या बाजूला ठेवतो.)
शर्वरी : बापरे, काय खरं दिसत नाही या पावसाचं!
विक्रम : (थोडा काळजीत पडलेला) कुठनं तुझ्या नादाला लागलो असं वाटायला लागलंय आता.
शर्वरी : असं का बोलतोस?
विक्रम : नाहीतर काय करू? विचार कर! परत जायचं का? चार वेळा घसरून पडलीस इथं पोचेपर्यंत.
शर्वरी : नाही नाही, आय ॲम फाईन! आलोय इतक्या लांब तर जाऊ वरपर्यंत. नाहीतर टोचणी लागून राहील मनाला.
शिवा : म्या आधीच बोललो व्हतो, आता उमाईचं दर्शन घेतल्याशिवाय मागं फिरता यायचं नाही!
विक्रम : तेव्हा गांभीर्य लक्षात आलं नाही, उत्साहाच्या भरात हो म्हणून गेलो!
शिवा : पाऊस असाच वाढत गेला तर रातपण हिथंच काढावी लागंल!
विक्रम : बापरे! (शर्वरीला) अजूनही विचार कर!
शर्वरी : माझा कॉन्फिडन्स घालवू नकोस तू!
शिवा : (धोरणीपणे) तिला कशापाय घाबरवताय तुमी?(शर्वरीला) ती हिरकणीची गोष्ट माहीत हाय ना ग पोरी तुला?
शर्वरी : (प्रेरित होत, ठामपणे) ठरलं! थांबू आपण!
विक्रम : (तिचा निर्धार पाहून) तू म्हणतेस तर थांबू पण बाबांशी फोनवर बोलून घे मी मेल चेक करतो तोवर!
शर्वरी : हो, तेच होतं माझ्या मनात आता. (संगीत सुरू होतं. शर्वरी फोन लावत आहे, विक्रम लॅपटॉप काढून मेल चेक करत आहे. तोवर शिवा गाठोडे उघडून त्यातून प्लॅस्टिकचं एक मोठं कापड काढतो आणि रंगमंचाच्या डाव्या बाजूला एक तात्पुरता निवारा तयार करू लागतो. गाठोड्यातून धोतर,बंडी, मुंडासे काढून विक्रमकडे देत ‘कापडं बदलून घ्या' असं म्हणत आजूबाजूच्या काट्याकुट्या एकत्र करून शेकोटी पेटवतो. विक्रम जॅकेट, कॅप काढून झाडाच्या एका फांदीला अडकवतो, शिवाने दिलेल्या पंचाने केस पुसतो. डोक्याला मुंडासे गुंडाळतो. तोवर शेकोटी पेटलेली.)
शर्वरी : फोन लागत नाही रे, बॅटरीपण डाऊन होत आलीय.
विक्रम : मलाही नेटवर्क मिळत नाही, थोड्या वेळानं ट्राय करतो परत.
शर्वरी : हं...
शर्वरी : (त्याच्याकडे पाहून हसत) या मुंडाश्यात फार
हॅण्डसम दिसतोयस बरं का तू!
विक्रम : तुझ्या तावडीत सापडलोय तर कर चेष्टा!
शर्वरी : चेष्टा नाही रे,खरंच! आजचा दिवस वेगळाच उगवायलाय आयुष्यात असं वाटतंय आता...

शिवा : खरं बोललात तुम्ही सावरीताई! नशीब लागतं असा दिवस आविष्यात उगवायला...
विक्रम : म्हणजे?
शिवा : आज भाद्रपद-पौर्णिमा.
शर्वरी : भाद्रपद-पौर्णिमा?
शिवा : तीच गंमत सांगणार होतो मी तुम्हाला. पूर्णचंद्र- दर्शनाचा दिवस हाय आज. नशीब आसलं तर तेही घडंल.
शर्वरी : ओ, ग्रेट!
शिवा : ईस वर्षामागं–म्हजी बघा, दोनहजार साली असं घडलं होतं येकडाव. आन् यानंतर पुढचा योग तब्बल तीस वर्षांनी, म्हजी बघा दोन हजार पन्नाससाली येणार हाय.
शर्वरी : भाग्यच म्हणायला पाहिजे याला, दुसरं काय?
विक्रम : भाग्य वगैरे असं काही नसतं. साधं खगोलशास्त्र आहे ते!
शर्वरी : अरे पण ही गोष्ट आपल्याला स्वतःच्या डोळ्यांनी सगुण-साकार स्वरूपात बघायला मिळू शकते हे महत्त्वाचं नाही का? 'लाईफ- टाईम अचिव्हमेंट' ठरू शकते ती! (नव्या निर्धाराने) काहीही होवो आता मागं फिरायचं नाही!
विक्रम : अग पण खाण्यापिण्याची सोय नाही, कपडे नाहीत. आजारी पडलीस तर काय होईल?
शर्वरी : काही आजारी पडत नाही, आणि काही झालंच तर (शिवाकडे पहात) 'काका मला वाचवा'! (हसते)
शिवा : उमाईची इच्छा!आन् ती काय वाईट-वंगाळ व्हऊ देणार न्हाय पोरी!
(खालून बाज्याचा आवाज येतो...)
बाज्या : कोण हाय का रं बाबानू वर? काळोख दाटून आला येकायेकी, पावसानं पण धार धरलीय सारखी. (मागच्या बाजूने खालून डोकं वर काढत) कोण, शिवा तू व्हय? बरं झालं, देव पावला म्हणायचं...
शिवा : (त्याला वर खेचत) सांभाळून बरं का, घसरलास तर पार तळाशी जाशील. हाडपण गावायचं न्हाय मग.
बाज्या : तू नग शिकवू मस्नी, रोजची वाट हाय माझी.
शिवा : मग आता कसा काय गळपटलास तू?
गंगी : गळपटतोय कशानं? गंगीनं टकुरं फिरवलं माझं.
शिवा : ती कशापाय फिरवतीय? उलट तीच येडी झालाय तुला शोधता शोधता!
बाज्या : (चिडत) तू शिकीव मला!
शिवा : आर पर तिला सोडून म्होरं का पळत आलास तू?
बाज्या : ती दमतीय म्हनून तिच्या मदतीसाठी माकडखिंडीची वाट धरली म्या पण ती गेली येड्याधोंडीच्या अंगानं वर...
शिवा : पोचलीपण आसंल वर!
बाज्या : (हात जोडत) उमाईची किरपा! ती बघतीय समदं!
शिवा : एवढी कशापाय शेवा करता रं तिची?
बाज्या : आज ना उद्या भेटंल बाळ आमचा असा इश्वास हाय गंगीचा...
शिवा : हां, पर इतकी वर्षं झाली आता ...
बाज्या : (त्याला विक्रम दिसतो. संगीत. तो त्याला मुलगा समजून भ्रमिष्टागत बोलू लागते.) आलास तू खंडूबाळा? कुठं व्हतास इतकं दिस? आई-बाला टाकून कुठं गेला व्हतास? सोभतं का रं हे तुला? आरं र रं, पार रया गेली रं तुझी, काय खातपीत व्हतास का न्हाय रं बाबा?
शिवा : अरे खंडोजी न्हाय त्यो, फिराया आल्याती पोरं ती! सांगितलं ना मगाशी? विक्रम नाव हाय त्याचं.

बाज्या : न्हाय न्हाय, हा खंडूच हाय माझा. तू फशिवतुयास मस्नी... ( विक्रमजवळ जाऊन बळेबळे त्याला जवळ घेत) आता अजाबात सोडून जायाचं न्हाय आमाला! या म्हातारपणात आम्हाला आधार नको तुझा? (शर्वरीकडे पहात) आन् ही कोन बया? लगीन केलंस का काय?

विक्रम : अहो काय चाललंय तुमचं हे काका?... तुम्ही समजताय तो मी नाही! ओ शिट्!

शिवा : (चिडत) अरे खंडू न्हाय त्यो, सांगीटलं न्हाय का येकडाव? सुद्धीवर ये बाज्या,खंडू ह्या जगात ऱ्हायला न्हाय आता, शाणा व्हय! (बाज्या 'अरं माझ्या बाळा, कवा भेटशील रं मस्नी? असा कसा सोडून गेलास आपल्या आई-बाला?' म्हणत रडू लागतो. विक्रम त्याच्या पाठीवर हात ठेवून धीर देत शांत करत आहे. एकदम कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज)

शिवा : अरं, हा तर वाघ्याचा आवाज! आला का काय हा शोधत मागोमाग?

(शिवा धावत विंगेजवळ जातो, स्टेजवर दिसेल न दिसेल अशा पद्धतीने अंगावर उडी मारणाऱ्या वाघ्याला-)

शिवा : अरे हो हो, किती जीव लावशील, मी काय कुठं लांब गेलो नव्हतो पळून.

विक्रम : काय नाव याचं?

शिवा : वाघ्या!

शर्वरी : महाराजांच्या कुत्र्याचं नाव पण वाघ्याच होतं ना

शिवा : व्हय की! तुम्ही काही म्हणा पण मुक्या प्राण्याची सर नाय माणसाला. आपल्या काळजीनं वर आला बघा वाघ्या! (वाघ्या कू कू करत शिवाला विंगेत आत ओढत आहे.) आर हो हो, काय झालं, काय झालं? बस तिथं, बस गपचीप, बस म्हनतो ना? (विंगेत बघतो तर तिथे पार्वती) आरं तिच्या, हिला घेऊन आलास व्हय?

शर्वरी : कोण आलंय?

शिवा : दुसरं कोण, पारी माझी. (पार्वती येते. वय ५५ वर्षे. तरतरीत, बुद्धिमान! नऊवार साडी,खणाची चोळी, डोक्यावर गाठोडं, हातात पिशवी.)

शिवा : (तिच्याकडंचं सामान घेत) अग खुळी झालीस का तू पारे, कशापाय आलीस जीव धोक्यात घालून?

पार्वती : कशापाय म्हजी? जिथं माझा शिवा, तिथं पारू! (हसते) तुमी वर आलाय हे कळलं, मग जे सापडलं ते सामान घेऊन निघाल्ये वर. पाऊस इतका भरून आलाय की आता इथनं हलता पण यायचं नाय आपल्याला.

शिवा : (ओळख करून देत) पोरानू, ही माझी पारी...

शर्वरी/विक्रम : नमस्ते काकी!

शिवा : हा विक्रम, आन् ही सावरी!

पार्वती : नमस्ते, नमस्ते! (शर्वरीला) किती भिजलीस गं पोरी? अशानं आजारी पडशील ना, थांब. कापडं देती म्या तुला बदलाया.( गाठोड्यातून एक जुनाट लुगडं-चोळी काढून देत) जा, बदल तिकडं आडोशाला जाऊन... शर्वरी आडोशाला जाते. पार्वती गाठोड्यातून फोल्डिंगचा टेन्ट काढून शिवाला देत) हा घ्या, लावा तिकडं...

शिवा : वा, हे मातर लयी झ्याक केलंस तू.

विक्रम : चॅयला, टेन्ट? विश्वास बसत नाही माझा काकी!

पार्वती : इतकी वर्ष झाली, अंदाज असतो आमाला कधी काय उपेगी पडंल त्याचा!

(प्रकाश बदलत आहे. शिवा, विक्रम उजवीकडे टेन्ट लावू लागतात. पार्वती बोचक्यातील खाण्यापिण्याचे सामान, तांब्या-पेला, पातेले, डबे इ. बाहेर काढते, तोवर शिवा या दोघांना पार्वतीविषयी अधिक माहिती देत आहे.)

शिवा : गावात सुईणीचं काम करती ही. हाताला गुण असा हाय की उभ्या पंचक्रोशीत एखादी बाई अडली कुठं तर डाक्टरपण बोलवून घेत्यात तिला.

विक्रम : वाह, क्या बात है!

शिवा : झाडपाला आणि ओषधी वनस्पतींची इत्की म्हायती हाय की लांबलांबनं लोक येत्यात औषधपाण्यासाठी.

पार्वती : मला काय कळतंय त्यातलं? गंगीनं शिकवलं. बाज्या : लय गुणाची हाय माझी गंगी!
पार्वती : बाज्यादा, जरा पिठलं गरम करायला घे बरं ! (बाज्या त्या कामाला लागतो. तोवर शर्वरी कपडे बदलून आलेली. आता ती साडीचोळीत एकदम क्युट दिसत आहे. ओले कपडे ती शेकोटीच्या आजुबाजूला वाळत घालते आणि मग सॅकमधून 'ते' पार्सल काढून पार्वतीकडे देत–)
शर्वरी : ( यात पिझ्झा आहे, बर्गर आहे, सॅन्डविचपण आहे. एव्हाना पिठलं झालं असेल त्याचं पण गरम करून बघू.
(पार्वती पार्सल घेते, त्यातील सारे पदार्थ बाहेर काढून गरम करू लागते. रात्र वाढलेली. रातकिड्यांची किरकिर.)
पार्वती : बाज्यादा, या हिकडं, हातपाय शेका, गार पडला असाल...
बाज्या : (संभ्रमित) काय चकवा पडला कळंना–
शिवा : काय झालं रं?
बाज्या : आरं गंगीच्या मागं तासभर फिरतुय पर फिरून फिरून तिथंच! फिरून फिरून तिथंच!
शिवा : भुताटकी झाली असंल कायतरी.
बाज्या : भुताखेतावर इश्वास न्हाय माझा.
पार्वती : (उस्फूर्तपणे) उलट ह्याला बघून भुतंच पळून जातात समदी गावाबाहीर. (सारे हसतात. संगीत)
शिवा : (बाज्याला) बाज्यादा, गाणं म्हण की एखादं.
शर्वरी : हो हो म्हणा की!
विक्रम : वा, म्हणा ना, मजा येईल अगदी. (सगळ्यांचा आग्रह... तो हो ना करत तयार होतो.)
गंगी : म्या गाणं म्हणतू पर तुमी समद्यांनी नाचायचं, हाय का कबूल?
(सर्वजण उत्साहात 'हो हो' करतात. पार्श्वभूमीवर ढोल वाजू लागतो. छान गाणे सुरू होते. शेकोटीभोवती सारे लयीत नाचू लागतात. ढोलाचा आणि संगीताचा आवाज टिपेला जातो. हळूहळू पडदा.)

**मध्यंतर.**

***

**अंक दुसरा** / प्रवेश पहिला / अ

(पडदा उघडतो. उत्तररात्रीचा मंद निळा प्रकाश. रातकिड्यांची किरकिर. टेन्टच्या बाजूला विक्रम-शर्वरी, डाव्या बाजूला बाज्या तर मधोमध उंचवट्यावर शिवा-पार्वती! झोप येत नाही म्हणून सारे जागत बसलेले. अर्थात ते एकमेकांना दिसत नाहीत. त्या त्या दृश्याच्या वेळी फक्त तेवढा भाग उजळतो. हळूहळू चांदणं वाढत जात आहे. चंद्र कधी ढगांच्या आड तर कधी बाहेर. त्यामुळे रंगमंचावर चांदणं आणि काळोखाचा जणू खेळ सुरू आहे. बाज्यावर स्पॉट येतो. सुफी भजनातील संगीताचा तुकडा हलकासा वाजत आहे.)
बाज्या : (स्वतःशी) मध्यान रात झाली तरी डोळ्याला डोळा लागंना. घरी नीट गेली आसंल ना गंगी? कितीदा सांगितलं तिला ती अशी येड्यासारखी वागत जाऊ नको! खंडोजी एकदा गेला तो गेला! आता काय परत येत न्हाय त्यो. डोस्क्यातनं काढून टाक पर नाय तिला पटत ते!
कितीदा सांगितलं, “अगं फकस्त डोस्क्यातच हाय त्यो आता” तीस वर्षे झाली. सोड त्याला, मुक्त कर, तरंच सुखानं जगू आपण! तर म्हणती, ‘माझ्या काळजाचा तुकडा त्यो, त्याला कसं सोडू? आन् उमाईवर ईश्वास हाय माझा. आणंल ती त्याला एक ना एक दिस परत.’ वर मलाच इच्यारती ‘तुमी इसराल का कधी खंडूला? खरं बोला अगदी, माझी शपथ हाय तुम्हाला!’

आता कसं सांगू तुला गंगे? त्यो तुझ्या काळजाचा तुकडा हाय आन् माझा कोणीच नाय का? पर आभाळच फाटलंय तर कुठं कुठं ठिगळ लावायचं त्याला? जिमीन गेली ती गेली, खंडू गेला तो गेला,काशी गेली तं गेली... धड खाणं न्हाय का पिणं न्हाय. कामात लक्ष न्हाय का काय न्हाय. निस्तं येड्यागत फिरायचं रातदिस... किती दुख करत बसायचं? त्यापरीस आला दिस आपला असं म्हणत आनंदानं जगावं! दुख कुणाला न्हाय गंगे? त्यो परमेश्वरपण  कायतरी चटका दिल्याशिवाय सोडत न्हाय कुणाला... आन् त्योच परतेकाला जगण्याची वाट पण दाखवतोय नव्हं?
आता हे चांदनं पडलंय... पण मधीच काळोख झाल्याशिवाय त्याची किंमत कळती का आपल्याला?
कदी ऊन तं कवा पाऊस, कदी सुख तर कवा दुख! कशापाय तडफडत बसावं? परतेकालाच एक दिस सोडून जायाचं हाय हे जग! गंगे, तू मला आन् म्या तुला, दुसरं कोण न्हाय आपल्याला ह्या म्हतारपणात! लगीन लावून आणली तुला तवांधरनं सोडली न्हाय कधी एकटी. रातदिस जोडीनं ऱ्हायलो. जोडीनं म्हेनत केली. जोडीनं कांदा-भाकर खाल्ली. सुख दुख वाटून घेतलं. मरताना संगतच मरण यावं ही विच्छा हाय आता!  (हात जोडत वर पहात) उमाईच्या मनात काय आसंल तसं व्हईल. ती हाय मदतीला. सकाळी देवळात जातो दर्शन घेतो, देवीला कौल लावून इच्यारतो पुढं काय करायचं ते! पडतो आता जरा, उजाडंल थोड्या येळानं. (त्यांच्यावर अंधार)

प्रवेश पहिला / ब

(विक्रम-शर्वरीवर प्रकाश. हलकंसं संगीत. शर्वरी आळस देत टेन्टमधून बाहेर येते. आसमंत न्याहाळते. बाहेर विक्रम अंगावर घोंगडी घेऊन पहुडलेला. उठून बसतो.)
शर्वरी : जागा आहेस अजून?
विक्रम : अगं झोपच येत नाही...
शर्वरी : कसला विचार करतोयस एवढा?
विक्रम : तसं काही विशेष नाही...
शर्वरी : तरीपण?
विक्रम : अशा निवांतपणाची सवय नाही, जणू खायला उठलाय तो!
शर्वरी : मग त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न कर की!
विक्रम : म्हणजे काय करू?
शर्वरी : स्वतःच्या मनात डोकावण्याचा प्रयत्न कर.
विक्रम : मला नाही जमत ते!
शर्वरी : गुलाम झालोय आपण या भयंकर जगण्याचे.
विक्रम : म्हणजे?
शर्वरी : आर्टिफिशियल इंटेलिजन्सनं सगळं जगणं ताब्यात घेतलंय. एक दिवस पूर्णपणे गिळून टाकणार आहे ते आपल्याला!
विक्रम : एआय हा काही शत्रू नाही आपला. जगणं बरंच सोपं करतोय तो हेही लक्षात घे!
शर्वरी : फायद्यापेक्षा तोटेच अधिक आहेत त्याचे!
विक्रम : 'रिमोट' तर आपल्याच हातात असतो ना त्याचा?
शर्वरी : (गप्प)
विक्रम : आधुनिकीकरणाच्या विरोधात बोलण्याची फॅशन आलीय जगभर... त्याशिवाय आपला मोठेपणा सिद्धच होत नाही जणू!
शर्वरी : (गप्प)

विक्रम : तू का जागी आहेस अजून?
शर्वरी : जांभळ्या रंगाचा महासागर!
विक्रम : ऑ?
शर्वरी : (संगीत) कालच्या त्या कारवीनं खुळं केलंय मला अगदी! (त्या आठवणीत हरवून) एक नाही दोन नाही चक्क बारा वर्ष लागतात तिला फुलायला. आणि त्या फुलाचं आयुष्य किती तर फक्त पंधरा दिवसांचं! पंधरा दिवसांच्या आनंदोत्सवासाठी बारा वर्षांची घोर तपश्चर्या!
विक्रम : काही ॲचिव्ह करायचं तर हार्डशिप ही आलीच! शर्वरी : (स्वतःत हरवलेली) तिचं कोणी कौतुक करो न करो, हौसमौज करो न करो, तिच्याकडे कोणी लक्ष देवो, न देवो... (विक्रम गप्प ऐकत आहे, शर्वरी पुढे सुरू) आणि आपण काय चिकटून बसतो रे एकेक गोष्टीना! किती झटपट रिझल्ट हवा असतो आपल्याला! किती पटकन शरण जातो परिस्थितीला आपण!
विक्रम : इतकं सेंटीमेंटल होण्याची गरज नाही! भावनांचा  किती ॲडव्हाण्टेज घ्यावा माणसानं?
शर्वरी : म्हणजे?
विक्रम : मीपण पहिल्यांदाच पाहिली काल कारवीची फुलं. पण तुझ्यासारखा वाहून गेलो नाही त्यात... ट्राय टू कंट्रोल युवर इमोशन्स.
शर्वरी : कधीतरी भावनांना मुक्तपणे वाहू देणं हे सुद्धा आवश्यक असतं - मनाच्या निकोप वाढीसाठी!
विक्रम : सायकिॲट्रिस्टपण झालीस तू आता!
शर्वरी : चेष्टा कर तू पण निसर्गाच्या सान्निध्यात आलं की काही ना काही सुचत राहतं असं... निसर्ग आतून श्रीमंत करत नेतो आपल्याला...ती आतली ओल सांभाळणं, टिकवून ठेवणं, अंतःकरणात डोकावून पाहायला शिकणं हे खरं जगणं!
विक्रम : झालंय काय तुला नक्की?
शर्वरी : तू प्रेम करत नाहीस माझ्यावर?
विक्रम : करतो पण कोणत्याही गोष्टीचं उथळ प्रदर्शन करणं आवडत नाही मला. आणि---
शर्वरी : आणि काय? बोल ना!
विक्रम : खरं सांगायचं तर प्रेम वगैरे झूट सगळं... इट्स ऑल बायॉलॉजी! खरं असतं शरीरशास्त्र!
शर्वरी : अरे काय हे!
विक्रम : काय खोटंय त्यात?
शर्वरी : शरीरानं नाही तर मनानं अधिक जवळ असतात माणसं!
विक्रम : हे दुसरं खोटं!
शर्वरी : शपथ घे माझी...
विक्रम : शपथेवर विश्वास नाही माझा.
शर्वरी : तेच सांगतेय मी! कधीतरी आपला आतला आवाज  ऐकण्याचा प्रयत्न कर. त्या गुगलच्या ऑफिसमध्येसुद्धा दर एका तासाने काही क्षण श्वासावर लक्ष केंद्रित करायला शिकवतात हल्ली! (संगीत.)
विक्रम : (थोडा बदलत) खरं सांगायचं तर मलाही असंच काहीसं फिलिंग येतं अधूनमधून.
शर्वरी : येतं ना मग मान्य करायचं ते!
विक्रम : कुणीतरी दुसराच हलवतोय सूत्रं आणि नाचवतोय आपल्याला असं वाटत रहातं मग!
शर्वरी : (खुश होत) आता कसं बोललास!
विक्रम : म्हणजे जे तुला हवं ते मी बोलायचं, ते मान्य करायचं, मग मी चांगला?
शर्वरी : अगदी असंच काही नाही. तुझ्या त्या कोशातून थोडा बाहेर ये; इतकच!

विक्रम : (थोडा सैलावत...) तू म्हणतेस ते खरंय पण मी तरी काय करू? महत्त्वाकांक्षेचं क्षितीज सतत पुढं पुढं खेचत नेतं मला... आंधळं, मुकं आणि बहिरं करून टाकतं!
शर्वरी : अशावेळी आतला आवाज ऐकायचा आपला!
विक्रम : आतला आवाज कधी कधी सांगतो की, कचरा आत घेणं थांबव आणि आतल्या सुगंधाला बाहेर पडण्यासाठी वाट मोकळी करून दे. बाहेर एक सुंदर जगणं वाट पाहतंय तुझी, आतूर आहे तुझ्या स्वागतासाठी! पण नाही जमत. मग पुन्हा डोळ्यावर पट्टी! पैसा-प्रतिष्ठेच्या मागं लागणं, सो कॉल्ड यशाच्या धुक्यात रस्ता हरवून बसणं...
शर्वरी : यश-इच्छा-आकांक्षांचा पाठलाग करणं सोडून दिलं की त्याच मग पायात घोटाळणाऱ्या मांजरीसारख्या मागंमागं येऊ लागतात!
विक्रम : (पुन्हा कोषात जात) हा भाबडा आशावाद अनेक वर्षं जिवंत ठेवून होतो मी... पण लक्षात आलं की काय काय म्हणून मूर्खपणा सहन करायचा इथं? इथलं ते भंपक राजकारण, भ्रष्ट व्यवस्था, कारस्थानं, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य... धर्माधर्मातील वितंडवाद, गोरगरिबांची पिळवणूक, बलात्कार करून पेट्रोल ओतून बायांना जाळून टाकणं, शहाण्या समजल्या जाणाऱ्या माणसांचा साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रातील बदलास नकार... काय काय सहन करायचं?
शर्वरी : हेच खरं आव्हान आहे ना आपल्यासमोरचं? दुसऱ्या देशात जाऊन राहाणं हे त्यावरचं उत्तर नाही. उलट पळपुटेपणा झाला तो!
विक्रम : (चिडत) जिथं पिढ्यानपिढ्या अज्ञान जोपासलं जातं आणि त्याची लाज न बाळगता उलट त्यावर शहाणपणाचा मुलामा चढवला जातो तिथं कसलं आलंय आव्हान? कसं जगायचं इथं?
शर्वरी : कशासाठी जगायचं हे कळलं की कसं जगायचं हे आपोआप समजतं!
विक्रम : (अस्वस्थ)
शर्वरी : सगळा चिखलगाळ उपसून काढ मनातून, आतले झरे मोकळे कर... ट्राय टू अंडरस्टँड युवरसेल्फ!
विक्रम : कशाला मला सुधारण्याच्या फंदात पडतेस तू?
शर्वरी : सुधारण्याचा प्रश्नच नाही. मुळात प्रत्येक माणूस चांगला असतो. तुझ्या आतील सुगंधाला बाहेर पडण्यासाठी मोकळी वाट मिळावी म्हणून बोलतेय मी! (संगीत)
विक्रम : (समंजस माघार घेत) वकिलीसुद्धा चांगली चालू शकते तुझी!
शर्वरी : आली ना गाडी रुळावर?
विक्रम : काय हुकूम आहे न्यायाधीश महाराजांचा?
शर्वरी : हरभऱ्याच्या झाडावर चढणार नाही मी, नाहीतर लगेच 'आय लव्ह यू' असं म्हणत मिठी मारायला धावशील. अजून लग्न झालेलं नाही आपलं!
विक्रम : माहिताय मला ते चांगलं...आणि पुरूषांना सदाचाराची शिकवण देणाऱ्या कंपनीची मालक आहे माझी होणारी बायको हेही विसरू शकत नाही मी, झालं?
शर्वरी : (खुशीने) देअर यू आर!
(प्रेमळ, दर्दभरा आलाप.चांदणं वाढतं.अंधार.)

प्रवेश पहिला / क

(शिवा-पार्वतीवर प्रकाश येतो)
शिवा : जागीच आहेस ना रात्रभर?
पार्वती : तुम्हाला कसं कळलं?

शिवा : मघाशी तिकडं त्या लॅपटॉपशी काहीतरी झटापट चालली होती तुझी.
पार्वती : काही मार्ग सुचतोय का हे बघत होते...
शिवा : मग सुचलं का काही?
पार्वती : हॅरीला मेल पाठवलीय. बघू काय उत्तर येतं ते!
पार्वती : मला वाटतं विक्रम आणि शर्वरीला स्पष्टपणे सांगून टाकावं आपण सगळं... (संगीत)
शिवा : कधीतरी कळणारच आहे त्यांना.
पार्वती : म्हणूनच म्हटलं, नाहीतर शॉकमध्ये जायचे बिचारे!
शिवा : ठीक आहे, बोलू त्यांच्याशी सकाळी. (संगीत)
शिवा : सहज चाळा म्हणून विक्रमचं हे जॅकेट घातलं तर एकदम जुन्या आठवणी जाग्या झाल्या.
पार्वती : मी पण काल थोडासा पिझ्झा खाल्ला तर कॉलेजचे दिवस आठवले एकदम.
शिवा : (जाणीव करून देत) ‘भूतकाळात कधी शिरायचं नाही’ अशी शपथ घेतली होती आपण!
पार्वती : कधी कधी एखादं पाऊल मागं जाऊन अधिक जोरानं स्टार्ट घ्यावा लागतो...
शिवा : तू कधी हार जाणार नाहीस बोलण्यात!
पार्वती : लढाईपेक्षा तह करण्याला नेहमी पसंती दिली तुम्ही, हे माहीत नाही का मला?
शिवा : आणि आता तर काय गडावरच आहोत आपण. (दोघेही हसतात)
शिवा : तुला पश्चाताप होतो कधी आपण मुंबई सोडल्याचा?
पार्वती : अजिबात नाही... तुम्हाला?
शिवा : नाही. उलट अभिमान वाटतो. (स्वतःत हरवत) इंजिनिअर म्हणून काम करताना इतक्या इमारती, इतके रस्ते, इतके पूल उभारले पण माणसांची मनं जोडतोय असं वाटलंच नाही कधी. (संगीत) किती वेळा बोललो वरच्या अधिकाऱ्यांशी की आपण बदलून टाकू हे सगळं. साध्या-सोप्या प्रभावी कामाचे नवे आदर्श निर्माण करू. लोकाना परवडतील, निसर्गाच्या हातात हात घालून जातील असे नवे प्रयोग करू. पण सगळे मलाच खुळ्यात काढायचे, जाणून-बुजून बाजूला ठेवायचे. सगळं जगणं पोखरलेलं होतं तिथलं. भ्रष्ट, वरवरचं, कारस्थानांनी बुजबुजलेलं! सतत अस्वस्थ असायचो मी. ‘ डोंगरीचा पूल' कोसळला आणि त्यात पस्तीस माणसं ठार झाली तेव्हा अखेरचा दुवा तुटला! मग नाही थांबवू शकलो मी स्वतःला... राजीनामा दिला आणि बाहेर पडलो.
पार्वती : आणि मग पूर्वाश्रमीचे विनायक चित्रे, मुंबई विद्यापीठाचे गोल्ड मेडॅलिस्ट इंजिनीअर, सोन्यासारखी नोकरी सोडून इथं या खेडेगावात येऊन, शेतात घर बांधून, मोलमजुरी करत, शिवा बांदल म्हणून जगू लागले...
शिवा : आणि पूर्वाश्रमीची मिनाक्षी नाईक, एमबीबीएस वुईथ फ्लाईंग कलर्स - आपले सारे पाश तोडून, हायफाय जगणं सोडून पार्वती बांदल झाली आणि इथं येऊन सुईणीचं काम करू लागली.
पार्वती : ( स्वतःत हरवत)... साधा ऑक्सिजन नाही म्हणून ज्या दिवशी एक बाळ गेलं आमच्या हॉस्पिटलमधलं तेव्हा अगदी कडेलोटच झाला माझा. डीनना सागितलं की तुम्ही खरं कारण सांगून लोकांची माफी मागा, पण तेवढी हिंमत नव्हती त्यांच्यात. ‘लिगल डिपार्टमेंट बघून घेईल’ म्हणत जबाबदारी झटकून टाकली त्यानी, तेव्हाच ठरवलं की आता इथं थांबण्यात अर्थ नाही.
शिवा : आणि मग तू सुद्धा कापून टाकलेस मागचे दोर!
पार्वती : तुमचं इंजिनिअरिंग काय आणि आमचं मेडिकल काय, एकाच नाण्याच्या दोन बाजू! मनात आलं, की झालं तेवढं खूप झालं. खूप माहिती मिळाली, खूप ज्ञान मिळालं, तंत्रज्ञान तर इतकं मानेवर बसलं की त्याची किळसच यायला लागली!
विक्रम : खरं आहे, त्या ऑनलाइन यांत्रिक व्यवहारात माणसाला प्रत्यक्ष भेटणं, त्याच्या स्पर्शाचा आनंद मिळवणं हे विसरून गेलो आपण! स्मायली वापरण्याच्या नादात अनेक शब्दांचे उच्चारसुद्धा विसरलो आपण!
पार्वती : ते मुकं, बहिरं, आंधळं करून टाकणारं जगणं नाकारण्याची हिंमत दाखवणं हे आपल्यासाठी अधिक महत्त्वाचं होतं!

शिवा : थोडं उशिरा का होईना पण रस्ता मिळाला. जणू पुनर्जन्म झाला आपला!
पार्वती : नावसुद्धा टाकून दिलं आपण आपलं, मनाची पाटी कोरी करून नव्यानं जगायला लागलो. लक्षात आलं की  वरवरचं शहाणपण मिळवण्याऐवजी अडाणी होत जाणं महत्त्वाचं! मग एकेक पाश तोडत गेलो, गरजा कमी करत नेल्या... मेंदूतला गोंधळ कमी होत गेला तसतसा खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ कळत गेला. छान-प्रसन्न वाटू लागलं...
दोघेही : तुझे आहे तूजपाशी, परि तू जागा चुकलासी!
(मागच्या पडद्यावर भलेमोठे चंद्रबिंब संगीताच्या जोडीनं एकदम वर येतं आणि पडद्यावरच थांबतं. त्या प्रकाशात रंगमंच नाहून निघाला आहे. हा साऱ्यांसाठी साक्षात्काराचा क्षण. जणू जीवनाचा अर्थ साऱ्यांना नव्यानं गवसलेला आहे. येथे त्या तिघांवर तीन वेगवेगळे स्पॉट. ते सारे चंद्राकडे पहात प्रेक्षकांना पाठमोरे उभे.)
शिवा : (चंद्राकडे पहात दोन्ही हात वर करून उस्फूर्तपणे) तुला किती साठवून ठेवू हृदयात, किती भरून घेऊ श्वासात, कसे मानू तुझे आभार बापा निसर्गा? तुझ्यावर खूप अत्याचार केला आम्ही, विध्वंस केला तुझा. झाडांची कत्तल, घातक रसायने, विषारी वायू, प्लॅस्टिकचा अतिरेक, अनिर्बंध खाणकाम...सोसले भूकंप आणि महापुराचे धक्के पण नाही सुधारलो! प्रगतीच्या नावाखाली नवीन काही करू पहाणं म्हणजे जे आधीच पूर्ण आहे ते पूर्ण करू पाहण्याचा बावळटपणा होता आमचा. हातचं सोडून पळत्याच्या मागं लागण्याचा मूर्खपणा! माफ कर बापा, पदरात घे! उजळून काढ आमची आनंदानं जगण्याची, साधी-सोपी पायवाट. जागा कर आमच्यातील विवेक आणि दे सद्बुद्धी आम्हा सगळ्यांना आमच्या निर्मळ उगमाशी परतण्याची!
(संगीत...अंधार.)

अंक दुसरा / प्रवेश दुसरा

(पहाटेचा पहिला प्रहर. अंधारातूनच पिंगळ्याच्या छोट्या डमरूचा कुड कुड कुड कुड ऽऽऽ असा मंजुळ आवाज आणि त्या पाठोपाठ त्याची आळवणी ऐकू येते.)
पिंगळा बोलला,पिंगळा बोलला ...
(कुड कुड कुड कुड ऽऽऽ
कुड कुड कुड कुड ऽऽऽ )
जागं व्हा रं, जागं व्हा
रामपारी धरम करा.
पशुपक्षाला चारा पाणी
पिरेम जगा द्या, फळा-फुलां...
(कुड कुड कुड कुड ऽऽऽ
कुड कुड कुड कुड ऽऽऽ)
(काही क्षणांनी हलकासा प्रकाश. पक्ष्यांची किलबिल. कोवळ्या सूर्यकिरणांनी टेन्ट उजळतो. मग हळूहळू रंगमंचावर प्रकाश. विक्रम टेन्टबाहेर घोंगडी अंगावर घेऊन डुलक्या काढत आहे. दुसरीकडे प्लॅस्टिकच्या आडोशामागे चूल पेटलेली. पार्वती तांब्या, पेले, गडवा घेऊन बाहेर येते)
पार्वती : उठा,उठा! सकाळ झाली. (विक्रमला) विक्रमशेठ, उठा की! हे घ्या पाणी, चूळ भरा. सगळं आवरून निघायचं म्हटलं तरी नऊ वाजतील महाराजांच्या स्मारकाजवळ पोचायला. तिथनं मंदिरात जाऊ...
(चूळ भरण्यासाठी पेल्यात पाणी ओतून देते)
विक्रम : (तोंडावर पाणी मारून बाजूला चूळ भरत) थँक्यू काकी! मी बाजूला कुठं रेंज मिळते का बघून येतो...
पार्वती : दूध गरम केलंय तेवढं घेऊन जा!

विक्रम : (मोबाईल काढून हातात घेत) नाही; आलो मी लगेच परत. रात्रीपासून काहीच कॉन्टॅक्ट झालेलं नाही हॅरीशी... इट्स व्हेरी अर्जंट... (मोबाईल पहात घाईघाईने बाजूला विंगेत जातो. पार्वती टेन्टकडे जात शर्वरीला)

पार्वती : अहो सावरीताई... उठलात का? हे घ्या पाणी,चूळ भरा. आवरा पटापट. दूध पण आणलंय गरम गरम. (शर्वरी आळस देत बाहेर येते. कानावरून रूमाल बांधून घेतलेला. अंगावर पार्वतीने दिलेली गोधडी. शर्वरी चूळ भरते. तोंडावर पाणी मारून फ्रेश होते. तोवर शिवाही आपले आवरून  फ्रेश झालेला. पार्वती शर्वरीला आणि शिवाला गडव्यातलं दूध पेल्यात ओतून देत–)

पार्वती : घे. हे घ्या! बाज्या  कुठं दिसत नाय ते!

शिवा : देवळात जायाचं म्हून फाटंलाच उठून फुलं काढाया गेला त्यो.

पार्वती : आसं व्हय?

शर्वरी : (एक घोट घेत) वाव्व, इट्स ऑसम काकी!

पार्वती : काय म्हणालीस?

शर्वरी : छान आहे दूध,अगदी अमृतासारखं!

शिवा : (घोट घेत) व्वा!झ्याक एकदम!

पार्वती : आमची चांदी आहेच तशी. जसं तिचं नाव तसं तिचं दूध! आणि दुधात भेसळ नसती बरं का आमच्या!

शर्वरी : तुमचे आभार कसे मानावे हेच कळत नाही.

पार्वती : म्हजी कसं म्हणतीस गं पोरी?

शर्वरी : इतक्या आडवाटेला सकाळी सकाळी गूळ घातलेलं गरमागरम दूध मिळेल असं वाटलं नव्हतं कधी.

पार्वती : अडीनडीला काय उपेगी पडतं नि काय नाय, ते असतं सगळं डोक्यात आमच्या. म्याबी येती कधीकधी गडावर ह्यांच्यासोबत.

शर्वरी : यालाच प्लॅनिंग असं म्हणतात आमच्या एमबीएच्या अभ्यासक्रमात.

पार्वती : काय असतंय त्ये एम्बे?

शर्वरी  : एम्बे?(हसत) तुम्हाला कळणं कठीण आहे!

पार्वती : असं काय काम करतीस गं तू तुमच्या कंपनीत?

शर्वरी : महिलांनी मोठी स्वप्नं बघितली पाहिजेत, ती कृतीत उतरवली पाहिजेत आणि सत्य काय ते लोकांसमोर आणण्याचं धाडस दाखवलं पाहिजे... त्यासाठीच आम्ही 'ड्रीम','डेअर' अँण्ड 'डी-कोड' अर्थात् ’थ्री डी’ ही कंपनी जन्माला घातली आहे!

पार्वती : बयाऽऽऽ

शर्वरी : बायकांनी पुरुषांच्या बरोबरीनं पुढं यावं म्हणून प्रयत्न करतो आम्ही. नोकरी-धंद्याच्या ठिकाणी पुरूषांनी  बायांशी कसं वागावं याचंही ट्रेनिंगही देतो.

पार्वती : (तिरकसपणे) माणसानं माणसाशी कसं वागावं याचं ट्रेनिंग देण्याची येळ आली म्हजी खरंच जमाना बदलला. काय रं 'शिव्या'?

शिवा : खरं हाय ते, तू पण माझ्याशी कसं बोलायचं हे  शिकून घे आधी हिच्याकडनं! (सगळे हसतात)

(एकदम अंधार. विजेचा कडकडाट. धडामधुडूम आवाज. पाखरांचा कल्लोळ. किंकाळ्या. बाज्या मोठमोठ्यानं 'दरड कोसळली, दरड कोसळली, धावा धावा, वाचवा वाचवा' असं ओरडत आहे. दगड,माती खाली कोसळत असल्याचा आवाज. अंधुक प्रकाशात धुळीचा एक लोट रंगमंचावर येतो. शिवा, पार्वती, शर्वरी भयभीत झालेले. काही क्षणांनी बाज्या विक्रमला धरून हळूहळू स्टेजवर घेऊन येतो. अंग धुळीने माखलेलं, चेहरा मातीनं लडबडलेला. चालताना लंगडत आहे.)

शर्वरी : ओ माय गॉड, काय झालं रे, पडलास का काय कुठं? काही लागलं तर नाही ना, बघू?

(विक्रम तिच्या हाताचा आधार घेत 'अयाई ग' करत कळवळत एका ठिकाणी बसतो)

बाज्या : नशीब बलवत्तर म्हणून वाचला ह्यो. मोठी दरड कोसळली वरनं... दगड-धोंड्यांची राळ उडाली. य्योक मोठी धोंड तं अशी चाटूनच गेली खांद्याला... काय खरं नव्हतं त्याचं आज...(हात जोडून वर पहात) आई उमाई, उपकार झाले तुझे!
शर्वरी : ओ माय गॉड!
बाज्या : तोंडाला आणि पायालापण  मार बसलाय त्याच्या.  पारू जरा हळद घे आणि लाव त्याच्या जखमंवर.
पार्वती : थांबा 'फस्टेड'चं सामान हाय माझ्याकडं–
(शिवा पटकन बोचके आणतो पार्वती बोचक्यातून एक डबा काढते आणि त्यातून कापूस,आयोडीन असे साहित्य बाहेर काढत कापसाने विक्रमचा चेहरा पुसत मलमपट्टी करू लागते. शिवा तिला मदत करत आहे.)
शिवा : जीवावरचं संकट टळलं रे पोरा!
पार्वती : (चिडून विक्रमला) पण तुला तिकडं जायची गरज काय होती म्हणते मी? काय असा मेसेज येणार व्हता?
शर्वरी : (तिरकसपणे) एकवेळ प्राणवायू नाही मिळाला त्याला तरी जगू शकेल तो पण मोबाईल चालू पाहिजे!
शिवा : (विक्रमची पॅन्ट फोल्ड करून पाहतो. ढोपराच्या खाली चांगलंच लागलेलं आहे) आराराराररराऽऽऽ...रगात पण येतंया हितनं.
पार्वती : दमा वाईच... (तो भाग कापसाने पुसून तेथे मलमपट्टी करत) इतकी हौस आसंल तं तशी काळजी घ्यावी का न्हाय माण्सानं आपल्या वस्तूंची?
विक्रम : (स्वतःवर चिडलेला) मी काय टाईमपास म्हणून मोबाईल बघत होतो का? काम होतं महत्त्वाचं. तुम्हाला सांगून काय कळणार? नोकरी जायची वेळ आलीय माझी!
शर्वरी : पण आधी जीव महत्त्वाचा का नोकरी?
विक्रम : (आता त्याचा स्फोट होतो. शर्वरीला त्वेशाने) तुझ्यामुळे झालं हे सगळं! म्हटलं नंतर येऊ कधीतरी किल्ल्यावर, पण ऐकलंस का तू? तुझ्या नादाला लागून दोन दिवस बरबाद झाले माझे... कमिटमेंट दिली होती मी हॅरीला अपडेट करीन रोज म्हणून! काय ठेवणार तो आता नोकरीवर? आता बसतो इथंच भजन करत!
शर्वरी : मी काय केलं? माझ्यावर का चिडतोयस?
विक्रम : मी मूर्ख आहे म्हणून!
(शिवा 'अरे थांबा थांबा, भांडू नका' असं म्हणत एक छोटं गाठोडं आणून पार्वतीच्या हातात देतो. त्यातून ती एक प्लॅस्टिकची पिशवी आणि तीतून लॅपटॉपची बॅटरी काढून विक्रमसमोर धरत-)
पार्वती : बघा याचा काय उपेग होतो का ते?
विक्रम : लॅपटॉपची बॅटरी? (चकित झालेला) विश्वासच बसत नाही माझा. ही कुठं मिळाली तुम्हाला?
पार्वती : नाम्याची हाय. चुकून गाठोड्यात बांधली काल वर येताना...
विक्रम : (आता त्याचा मूड एकदम बदलतो) देव तुमचं भलं करो आणि अशीच मुलं सगळ्यांना लाभोत! (शर्वरीला) घे तो लॅपटॉप इकडे, घे लवकर, लाव पटापट.
शर्वरी : (दुखावलेली)
विक्रम : शरे, आय ॲम सॉरी, मी ओरडलो तुझ्यावर पण मला भानच राहिलं नाही. सॉरी म्हटलं ना? (ती लॅपटॉप पुढे करते. दोघेही तो कनेक्ट करतात. संगीत. काही क्षणांनी लॅपटॉप सुरू झालेला. विक्रम मेल पहात आहे. त्यावर हॅरीचा मेल आलेला... विक्रम खुश. उत्फुल्ल संगीत)
विक्रम : (अत्यानंदाने) या ऽऽऽ, येस येस ऽऽऽ
शर्वरी : अरे असं झालं तरी काय?
विक्रम : येस, येस ऽऽऽ
शर्वरी : अरे पण–

विक्रम : हॅरीचा मेल आलाय, त्याच्या कंपनीची एक शाखा भारतात सुरू करतोय तो, हेड ऑफिस मुंबईत ठेवतोय आणि त्याच्या सी.एस.आर. विभागाचा हेड म्हणून मुंबईतच प्रमोशन देतोय मला. ऑर्डरपण काढलीय.
शर्वरी : ओह माय गॉड! आय जस्ट कान्ट बिलिव्ह धिस!
विक्रम : आणि हे बघ इकडे... एकलाख डॉलर्सचा फंडपण मंजूर केलाय काम सुरू करायला.
शर्वरी : (लॅपटॉपवर पहात) मला चिमटा घे विक्रम. स्वप्नात तर नाही ना मी?
विक्रम : लक इज स्मायलिंग ऑन अस!
शर्वरी : 'गॉड इज ग्रेट' म्हणतात ते खोटं नाही. व्हिडीओ- कॉल लागतोय का बघ हॅरीला, आभार मानू आपण त्याचे. (“येस,येस” असे म्हणत विक्रम कॉल लावू लागतो) मोठी जबाबदारी टाकलीय त्यानं तुझ्यावर. यू विल हॅव टू प्रूव्ह युवर मेरीट नाऊ..
विक्रम : ऑफकोर्स आय डू. स्वीडनमध्ये 'इमर्जन्सी सपोर्ट स्कीम' ही एक आगळीवेगळी योजना सुरू करून एकच धमाल उडवून दिली होती आम्ही. तसंच काहीतरी महत्त्वाचं काम करूया इकडं... आहेत सगळ्या गोष्टी डोक्यात. खाली गेल्यावर डिटेल प्रपोजल पाठवतो हॅरीला.
शर्वरी : म्हणजे नक्की काय करणार आहेस तू?
विक्रम : इथं जे शिकलो त्याचं इम्प्लीमेंटेशन करणार!
शर्वरी : म्हणजे?
विक्रम : (फोनची रिंग जात असल्याचा आवाज येतो.) अगं व्हिडिओ कॉल लागतोय बघ.( रिंग जात आहे, तिकडून फोन उचलला जातो)
हॅरी : हॅलो ऽऽऽ
विक्रम : हॅलो ऽऽऽ
(हा संवाद मागील पडद्यावर दिसू लागतो. हॅरी आपल्या ऑफिसात बसला आहे. मागे त्याच्या कंपनीचा लोगो आणि पुस्तकांचे कपाट. गोरा-गोमटा, सोनेरी केसांचा. निळी हाय-नेक जर्सी, वर गुलाबी रंगाचे जॅकेट. डोळ्याला सोनेरी काड्यांचा सुंदर चष्मा.)
हॅरी : हॅलो विक्रम, हाऊ आर यू?
विक्रम : आय ॲम फाईन हॅरी, हौ आर यू?
हॅरी : आय ॲम फाईन टू.
विक्रम : आय मस्ट थँक्यू फॉर गिव्हिंग मी सच अ
वण्डरफुल अपॉर्च्युनिटी.
हॅरी : दॅट क्रेडिट गोज टू पार्वतीमॅम वोन्ली!
विक्रम : पार्वतीमॅम? डू यू नो हर? शी इज विथ मी नाऊ.
हॅरी : आय नो. कॅन यू प्लीज कॉल हर ऑन द स्क्रीन?
विक्रम : येस, ऑफकोर्स... (पार्वतीला) काकी, इकडे या! हे बघा, स्वीडनला हॅरी म्हणून एक मित्र आहे माझा तो बोलतोय तुमच्याशी. तुम्हाला ओळखतो म्हणे तो! या स्क्रीनमध्ये बघायचं आणि बोलायचं. ओके? (हॅरीला) हिअर शी इज! प्लीज गो अहेड.
हॅरी : हॅलो पार्वतीमॅम, हॅलो, हॅलो ऽऽऽ
विक्रम : बोला काकी, बोला!
पार्वती : (बेअरिंग जुनेच) आरं पर कोन बोलतंय मस्न्या?
विक्रम : मस्न्या नाही, हॅरी बोलतोय हॅरी! बोला!
पार्वती : हॅलाऽऽव...
हॅरी : हॅलो, हॅरी स्पीकिंग. हॅलोऽऽऽ पार्वती मॅम?

पार्वती : (प्रयत्नपूर्वक) हॅलाऽऽव, नमश्ते हरिबुवा!
हॅरी : नमश्ते,रामराम... हौ आर यू मॅम?
विक्रम : (पार्वतीला) बोला बोला ...
पार्वती : (विक्रमला) आरं पर समजाय तं नको का काय बोलावं ते?
विक्रम : (नाद सोडून देत फोनवर) आय बिलिव्ह शी इज नॉट कम्फर्टेबल हॅरी...
हॅरी : डोन्ट टेल मी! कमॉन पार्वतीमॅम... कमॉन...
पार्वती : (हसत) फायनली द कॅट इज आऊट ऑफ द बॅग.
हॅरी : (हसत हसत) देअर यू आर!
पार्वती : थँक्यू सो मच फॉर एव्हरीथिंग यू डिड...
(विक्रम शर्वरी चकित झालेले.)
हॅरी : (चेहऱ्यावर अर्थपूर्ण स्मित) इट्स माय प्लेझर मॅम. लेट्स प्रे फॉर वेलबिईंग ऑफ एव्हरीवन ऑन धिस प्लॅनेट.
पार्वती : येस ऑफकोर्स!
(हात जोडलेले हॅरी,पार्वती, विक्रम, शर्वरी एकापाठोपाठ एक प्रार्थना म्हणताना पडद्यावर दिसू लागतात)
हॅरी : ॐ तत्सत् श्रीनारायण तू पुरुषोत्तम गुरु तू
पार्वती : सिद्ध बुद्ध तू,स्कन्द विनायक,सविता पावक तू
हॅरी : ब्रम्ह मज्द तू,यहव शक्ति तू, ईशू पिता प्रभु तू
पार्वती : रूद्र विष्णु तू, राम कृष्ण तू,रहीम ताओ तू
हॅरी : वासुदेव गौ, विश्वरूप तू,चिदानंद हरी तू
पार्वती : अद्वितीय तू,अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू ...
सिद्ध बुद्ध तू,स्कन्द विनायक,सविता पावक तू
(सगळे हात जोडून नमस्कार करत आहेत)
हॅरी : थँक्यू गाईज... इंडिया इज अ ग्रेट कंट्री बट यू हॅव टू मेक इट अ हॅपी कंट्री ऑल्सो...यू हॅव टू एज्युकेट पीपल टू बी हॅपी दॅन टू बी रिच!
पार्वती :ॲबसोल्युटली!
हॅरी : ऑल द बेस्ट ... बाऽऽऽय ...
विक्रम/शर्वरी : बाऽऽय... (मागील पडद्यावर अंधार होतो)
विक्रम : (लॅपटॉप बंद करत ) पण काकू हा सगळा घोटाळा आहे तरी काय?
पार्वती : कसला घोटाळा?
शर्वरी : काहीतरी गडबड केलीय तुम्ही!
पार्वती : ( आता मूळ बेअरिंगमध्ये) काही गडबड नाही रे... महाराजांची शिकवण– शक्तिपेक्षा युक्ती श्रेष्ठ!
विक्रम : म्हणजे?
पार्वती : ( काय ते सांगू लागते) निकोलस गोल्डस्मिथ आणि त्याची पत्नी मेरी हे दोघे गांधींचे भक्त. (हलकसं संगीत सुरू होतं.) गांधींजींसोबत ते दक्षिण अमेरिकेतून समाजसेवेसाठी भारतात आले.१९३० साली वर्ध्याला त्यांचं लग्न झालं. तिथं पुढच्या वर्षी ज्योनाथन ऊर्फ ज्यो जन्मला. वर्ध्याच्या 'नई तालीम' शाळेमध्ये तो शिकत होता. 'ॐ तत्सत्' ही प्रार्थना तिथंच शिकला तो! गांधीजींच्या निधनानंतर निकोलस आणि मेरी ज्योला घेऊन अमेरिकेत गेले. तिकडेच ज्यो लहानाचा मोठा झाला. वडिलांचा वारसा चालवत पुढं त्यानं 'वेलफेअर मिशनरीज ग्लोबल'ची स्थापना केली... आता ते सारं काम त्याचा मुलगा हॅरी पाहतो. विशेष म्हणजे आजही ज्योनाथन ही प्रार्थना तिकडे रोज म्हणत असतो. ती हॅरीला आपोआपच पाठ झाली. त्यानंही तो

परिपाठ पुढे सुरू ठेवला. विश्वबंधुत्वाचा खोलवर संस्कार झालेला हॅरी अमेरिकेतील चंगळवाद आणि दादागिरीच्या संस्कृतीला कंटाळून स्वीडनला निघून गेला आणि तेथून आपल्या कंपनीचं काम करू लागला. त्याच्याच कंपनीत विक्रम काम करतोय, हे माझ्या लक्षात आलं तेव्हा डोक्यात वीज चमकल्यागत झालं! तो धागा पकडून मी रात्री माझ्या लॅपटॉपवरून हॅरीला सविस्तर मेल पाठवून तुमचा प्रॉब्लेम कळवला, प्रार्थनेचा संदर्भ दिला, कॉपी ज्योनाथन यांनाही पाठवली– ॲण्ड, दॅट्स ऑल!

विक्रम : (थक्क) पण हे सगळं तुम्हाला कळलं कसं?

शर्वरी : अरे शिवाकाका म्हणत होते की त्यांचे आजोबा वर्ध्याला गांधीच्या 'नई तालीम' शाळेत शिकले म्हणून!

विक्रम : (डोक्यात प्रकाश पडल्यागत) ओ आय सी! असं आहे तर! (हात जोडत) खरंच धन्य आहात तुम्ही.

शिवा : (मूळ बेअरिंगमध्ये) धन्य आम्ही नाही तर गांधी, विनोबा धन्य आहेत. त्यांच्या विचारांची कास धरल्याशिवाय तरणोपाय नाही जगाला!

शर्वरी : येस,अगदी बरोबर. पण मला एक समजत नाही की तुम्ही आहात तरी कोण नक्की?

शिवा : त्यात तसं काहीही सिक्रेट नाही... मी पूर्वीचा विनायक चित्रे - इंजिनिअर, आणि ही मिनाक्षी नाईक - डॉक्टर! मुंबईसारख्या, दिवसेंदिवस डम्पिंग ग्राऊंड होत चाललेल्या आणि राक्षसी गतीनं बिघडत जाणाऱ्या शहराला गरज नाही आपली हे लक्षात आलं आणि जगण्याला जेथे अर्थ येऊ शकतो तेथे पोहोचायचं ठरवलं आम्ही.

पार्वती : आधुनिक होणं किंवा प्रगत होणं म्हणजे नक्की काय रे बाबांनो? गाडी, बंगला, उत्तमोत्तम कपडे, जमीन-जुमला, पैसाअडका, फाईव्हस्टार हॉटेलमधील मीटिंगा, चंगळ करत जगभर फिरणं?आपली भाषा,आपला देश सोडणं? आपल्या अन्नाशी संबंध तोडणं? स्वतःचं आकाश आकुंचित करत नेणं? नक्की काय?

शिवा : ग्लोबल होण्याच्या भ्रामक कल्पनेत अडकायचं नाही असं ठरवलं आणि सगळं सोपं झालं मग...

विक्रम : ओ...

शिवा : तसं पाहिलं तर ग्लोबल वगैरे असं काहीही नसतं. कुठंही गेलो तरी ग्लोबलच असतो आपण. उलट जितके लोकल तितके अधिक ग्लोबल!

शर्वरी : वा क्या बात है!

शिवा : ह्या विचारानं नवी ताकद दिली आम्हाला... मग मी झालो शिवा आणि ही पार्वती! आमच्या खोतीच्या जमिनी होत्या इकडं, त्यातली पाच-सहा गुंठे घेतली आणि बांधलं एक छोटं घरटं, मांडला नवा संसार!

पार्वती : आनंदानं जगण्यासाठी काय लागतं रे माणसाला? एक छोटंसं घर, कपड्याचे दोन जोड, गावात पिकणारं धान्य-भाजीपाला, निसर्गाचं बोट धरून त्याच्यासोबत चालण्याची वृत्ती आणि नातीगोती-मित्रमंडळी सांभाळत चराचरावर मायेची सावली धरणारं निर्मळ मन!

शिवा : आणि घर म्हणजे नुसतं विटा-माती, कौलांचं नाही बरं का? आपल्या मनातसुद्धा एक घर असतं. ते सापडणं, तिथं पोहोचणं सर्वांत महत्त्वाचं. सुख, समाधान, शांती सदैव नांदत असते तिथं. शेवटी तिथंच पोचायचं असतं प्रत्येकाला... हे कळलं आणि स्वातंत्र्य म्हणजे काय हे समजावून सांगणारी नवी खिडकी उघडली समोर. स्वातंत्र्य म्हणजे साधेपणा आणि साधेपणाची जाणीव हा मोक्ष!

विक्रम : (साक्षात्कार झाल्यागत) तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी!

पार्वती : देअर यू आर!

विक्रम : कालपासून बऱ्याच गोष्टी डोक्यात घोळत होत्या, त्यांना मोकळी वाट करून देणार आधी.

शर्वरी : म्हणजे?

विक्रम : पायथ्याशी उभारल्या जाणाऱ्या सॉ-मिलची परवानगी रद्द करायला लावायची सरकारला आपण! त्यासाठी गावकऱ्यांना विश्वासात घेऊन सत्याग्रह करायचा.

शिवा : भले शाब्बास!

विक्रम : गड-सुधारणेचं काम हाती घ्यायचं. पारंपरिक बियाणांचं जतन, जैविक खतांचा प्रसार, ग्रामीण भागातील सुलभ प्रसुतीसाठी जनजागरण, गडावरील औषधी वनस्पतींचा अभ्यास, पर्यावरण-रक्षण, स्थानिक जातींच्या झाडांची लागवड– अशी कामं हाती घ्यायची. त्यासाठी आवश्यक ते इन्फ्रास्ट्रक्चर उभारायचं. पैसा आहेच!

पार्वती : एक गोष्ट विसरू नका.

विक्रम : कोणती?

पार्वती : आज तुम्हाला स्वीडनहून हॅरीने मदत केली म्हणून सोपं झालंय सगळं पण उद्या तुम्हाला स्थानिक मदत मिळवून स्वतःच्या पायावर उभं राहावं लागणार आहे.

विक्रम : माझ्या मनातलं बोललात अगदी काकी. पण काळजी करू नका... वचन देतो मी तुम्हाला! (बाजाला जवळ घेत) गंगीला ठेचा, दहीभाकरी केंद्र काढून देऊ इथं आपण... तुमच्या मुलाच्या स्मरणार्थ 'खंडोजी ट्रेकर्स अकॅडेमी' सुरू करू आणि महाराजांच्या स्मारकाच्या बाजूला जीवा महालाचा पुतळा उभारण्याचं कामही लगेच हाती घेऊ. काय?

बाज्या : हर हर महादेव! आई उमाईचं चांगभलं!

विक्रम : निसर्गाचा सन्मान आणि स्थानिक माणसाच्या शहाणपणाचा आदर करायला पाहिजे हे इथं येऊन शिकायला मिळालं. नुसत्या पदव्या मिळवून काही भलं होणार नाही तर मन मोठं करता आलं पाहिजे माणसाला. खरं का न्हाय?

बाज्या : मला अडाण्याला काय कळतंय त्यातलं! पर तुझ्या रुपानं मला माझा खंडू परत मिळाला! (त्याला जवळ घेत) आजपास्नं तूच माझा खंडूबाळ! (हात जोडत) आई उमाई, तुझा महिमा अगाध आहे!

शर्वरी : (पार्वतीच्या कुशीत शिरत)आणि मलासुद्धा काकींच्या रूपानं माझी आई परत मिळाली.

शिवा : निसर्गाचा नियमच आहे तो! एका हाताने काढून घेतो तो, आणि दुसऱ्या हातानं पुन्हा माणसाच्या ओंजळीत टाकतो काहीतरी...

विक्रम : वा काका!

शिवा : मघाशी हॅरी काय म्हणाला ते नीट लक्षात घ्या.

विक्रम : काय?

शिवा : इंडिया इज अ ग्रेट कंट्री बट यू हॅव टू मेक इट अ हॅपी कंट्री ऑल्सो...याचा अर्थ काय? आनंदी देशांच्या यादीत पहिल्या शंभरातसुद्धा नाव नाही आपल्या देशाचं... ती जबाबदारी आपल्यावर टाकलीय त्यानं.

बाज्या : त्यातलं पहिलं पाऊल उचलायचं आता.

शिवा : म्हणजे?

बाज्या : या दोघांचं लगीन लावून टाकायचं!

पार्वती/ शिवा : (हसत) वा क्या बात है!

पार्वती : असा लक्ष्मी-नारायणासारखा जोडा शोधूनपण सापडायचा नाय जगात.

शिवा : अगदी खरं आहे तुझं. ही मुलं वरनं जरी अशी दिसत असली तरी आपल्यावरील संस्काराची परंपरा सोडलेली नाही त्यांनी हे महत्त्वाचं!

पार्वती : म्हणजे?

शिवा : विक्रमने कालची रात्र टेन्टच्या बाहेर काढली तेव्हाच ओळखलं मी हे! नाहीतर हल्लीच्या मुलांचं काय, लग्नाच्या आधीच हनीमून झालेला असतो त्यांचा!

शर्वरी : वा काका, पोलिस डिपार्टमेंटमध्येसुद्धा शोभून दिसला असता तुम्ही!

शिवा : 'जो बदल तुम्हाला जगात घडवून आणायचा आहे तो आधी तुमच्या स्वतःत घडवून आणणं गरजेचं!'

विक्रम : (ओळखत) महात्मा गांधी!

शिवा : अगदी बरोबर! त्या परीक्षेत पास झालाय तुम्ही. (सारे हसतात. वाघ्याच्या भुंकण्याचा आवाज)

शिवा : बघा, वाघ्यापण हजर झालाय लग्नासाठी!
बाज्या : (विंगेत पहात) आणि माझी गंगीपण आहे त्याच्यासोबत! आलो आमी, तुम्ही व्हा म्होरं! चला वेळ घालवू नका आता. असा चांगला दिस आणि असं चांगलं ठिकाण मिळंल का कधी लगीन लावाया?
शिवा : (बाज्याला) बरं झालं सकाळीच फुलांचे हार करून आणलेस तू बाज्यादा!
गंगी : (विक्रमकडे हात दाखवत) याचा जीव वाचवायचं पुण्य पण मिळालं की त्यामुळं!
(सर्वजण उत्साहाने ' हो,हो...चला चला' म्हणत वर जाण्यासाठी निघतात.)
शिवा : (त्याना थांबवत) अरे थांबा थांबा,एक मिनिट!
शर्वरी : काय झालं?
शिवा : आधी लगीन कोंडाण्याचं, मग रायबाचं!
विक्रम : म्हणजे?
शिवा : आता तुम्ही गड-सुधारणेच्या कामाची यादी वाचली, पण नुसतं बोलण्यापेक्षा कामपण सुरू करूया की लगेच! (सगळे प्रश्नार्थक मुद्रेने पहात आहेत) काही झाडं लावूया की आधी इथं!
(सर्वजण 'हो हो, बरोबर' म्हणत पुढे सरसावतात. मध्ये विक्रम-शर्वरी, त्यांच्या दोन्ही बाजूंनी शिवा-पार्वती आणि त्यांच्या दोन्ही बाजूने बाज्या असे प्रेक्षकसन्मुख उभे.
संगीत सुरू होते. शिवा आपल्या गाठोड्यातून पिंपळ आणि कडूलिंबाचे एकेक रोप काढून शर्वरीच्या आणि विक्रमच्या हातात देतो आणि फाळाच्या टोकानं खड्डे खणू लागतो)
शिवा : (रोप देत) हे घ्या विक्रमशेठ!
विक्रम : कसलं आहे हे?
शिवा : कडुलिंब! (सगळे हसतात)
विक्रम : हे चवीला कडू असलं तरी सर्वात जास्त प्राणवायू देणारं झाड आहे हे, हे विसरू नका! (सगळे हसतात.)
शिवा : (रोप देत) सावरीताई हे घ्या तुमी... लावा!
शर्वरी : कसलं आहे हे?
शिवा : पिंपळाचं! आणि त्याच्या मुलायम,कोवळ्या पानावर खोडकर बाळकृष्ण हसत हसत कसा जन्माला येतो त्याचा अनुभव द्या लवकरच आम्हाला, काय?
(सगळे हसत आहेत. ती रोप लावू लागते.बाज्या-गंगी माती घालून खड्डे बुजवू लागतात. शिवा-पार्वती वरून पाणी शिंपू लाघतात. हे सुरू असताना पार्श्वभूमीवर प्रार्थना सुरू आहे)
: ॐ तत्सत श्री नारायण तू, पुरुषोत्तम गुरु तू
सिद्ध बुद्ध तू, स्कन्द विनायक, सविता पावक तू
ब्रम्ह मज्द तू, यहव शक्ति तू, ईशू पिता प्रभु तू
रूद्र विष्णु तू, राम कृष्ण तू, रहीमताओ तू
वासुदेव गौ, विश्वरूप तू, चिदानंद हरी तू
अद्वितीय तू, अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू
(शेवटच्या ओळी सुरू असताना मागून लख्ख सूर्यप्रकाश येतो. आता सगळे वरच्या दिशेने निघालेले... त्यांच्या वलयांकित बाह्याकृती दिसू लागतात. पडद्यावर पाखरांचा थवा भरारत जाताना दिसू लागतो. स्वातंत्र्याचं, मुक्तीचं फील देणारं संगीत. ते वाढत जातं. वर जाता जाता सर्वजण हात हलवून प्रेक्षकांचा निरोप घेत आहेत...हळूहळू पडदा.)

* * *

**सूचना : या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत.** नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे  भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशाच विद्यमान अथवा भविष्यात येऊ घातलेल्या नव्या माध्यमातून पूर्ण,  अंशतः किंवा तत्सम कोणत्याही प्रकारच्या प्रसारणापूर्वी लेखकाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबईक्षेत्रात होईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

**प्रल्हाद जाधव**
**pralhadjadhav.one@gmail.com**
**९९२००७७६२६**

***